## विकणे आहे

- सोलापूर - अक्कलकोट रोड टच कोन्हाळी येथे 5 एकर जमीन विकणे आहे
- सोलापूर - पुणे हायवे रोड टच वडाची वाडी येथे साडे सहा एकर जमीन विकणे आहे
- सोलापूर - तुळजापूर रोड टच उळे येथे 33 गुंठे जमीन विकणे आहे
- गुळवंची - कोंडी रोड टच प्रति गुंठा 1 लाख प्रमाणे 11-11 गुंठे जमीन विकणे आहे.
- सोलापूर सिटीत संभाजी चौक ते रेल्वे ट्रॅक रोड टच प्लॉट विकणे आहे

मो. 9860848471/ 7741077411



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये



Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २०४ वा | गुरुवार, दि. २० मार्च २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


## तिला त्रास देऊ नको, रस्त्यात दिसली तर वळून बघू दे; गाडी चोरास कवीची कवितेतून विनंती

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** एखाद्याला एखादी वस्तू क्षुल्लक वाटत असते, तर एखाद्याच्या आयुष्यात त्या वस्तूची किंमत ही जिवापेक्षा कमी नसते. शहाजी कांबळे या तरुणाच्या आयुष्यात अतिशय महत्त्वाची असलेली त्याची दुचाकी चोरीला गेली. आधीच आर्थिक संकटात असलेल्या या हळव्या तरुणाने चोराला शिव्या न देता, गाडीला जास्त त्रास देऊ नको, कधी रस्त्यात दिसली, तर एकदा माझ्याकडे वळून बघू दे, अशी विनंती सोशल मीडियावर केली. शहाजी कांबळे याने २०१२ मध्ये एक सेकंड हँड दुचाकी घेतली. ८ मार्चला रात्री तो काळजापूर मारुती येथे पत्नीसह दर्शनासाठी आला. दर्शन झाल्यानंतर बाहेर आला, पाहतो तर काय? दुचाकी चोरीला गेली. वाट पाहिली. पण, गाडी परत घेऊन कुणी आले नाही.

# महाविकास आघाडी विधान परिषदेच्या सभापतींविरोधात करणार गेम?

## कामकाज चुकीच्या पद्धतीनं! राम शिंदेसह चित्र वाघ यांच्यावर विरोधकांचा आरोप

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** विधीमंडळाचं सध्या अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु आहे. या अधिवेशनात विविध मुद्द्यांवरुन सत्ताधारी आणि विरोधक आमनेसामने येताना दिसत आहेत. विधानसभा आणि विधान परिषद या दोन्ही सभागृहांमध्ये वातावरण तापताना दिसत आहे. विशेष म्हणजे विधान परिषदेत आज चांगला गोंधळ झालेला बघायला मिळाला. भाजपचे गटनेते प्रवीण दरेकर यांनी आज सभागृहात विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्या समर्थनार्थ विश्वास प्रस्ताव सादर केला. या विश्वास प्रस्तावावर विरोधकांनी विरोध केला. दरम्यान, हा प्रस्ताव सभागृहात मंजूर करण्यात आला. त्यामुळे विरोधक चांगलेच आक्रमक झाले.

यानंतर विरोधी पक्षाने आक्रमक भूमिका घेतली. विरोधी पक्षाच्या प्रतिनिधींनी सभागृहाच्या कामकाजांवर



बहिष्कार टाकला. विरोधक उद्या कामकाजात सहभागी होणार आहेत. पण ते उद्या काळ्या फिती लावून कामकाजात सहभागी होणार आहेत. विशेष म्हणजे उपसभापती नीलम गोऱ्हे या उद्या डायसवर बसल्यास कामकाजात सहभागी होणार नाही, असा इशारा विरोधी पक्षांनी दिला आहे. विरोधी बाकावर असलेल्या महाविकास आघाडीच्या प्रतिनिधींनी सभापतींवर अविश्वासाचा प्रस्ताव दाखल केला आहे. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी स्वतः याबाबत माहिती दिली आहे.

### विधान परिषदेत नेमकं काय घडलं?

विधान परिषदेच्या कामकाजांवर विरोधकांनी आज बोट ठेवलं. उपसभापतींच्या समर्थनार्थ कुठल्या नियमाखाली विश्वास प्रस्ताव आणला? असा सवाल विरोधकांनी केला. अविश्वास प्रस्तावासाठी नियम असतील तर विश्वास प्रस्तावाचं काय? असा सवाल विरोधकांनी केला. भाजपचे गटनेते प्रवीण दरेकर यांनी उपसभापतींचा विश्वास प्रस्ताव मांडला. त्यावर विरोधकांनी आक्षेप नोंदवला. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे आणि तालिका सभापती चित्रा वाघ यांच्यावर विरोधकांनी चुकीच्या पद्धतीने कामकाज केल्याचा आरोप केला आहे. तालिका सभापतींनी रुलिंग न दिल्यामुळे विरोधकांनी सभात्याग केला.

### अंबादास दानवे काय म्हणाले?

विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी याबाबत प्रतिक्रिया दिली आहे. "विधान परिषदेचे भारतीय जनता पक्षाचे गटनेते प्रवीण दरेकर यांनी उपसभापतींवर विश्वास दाखल करण्याचा प्रस्ताव ठेवला. हा प्रस्ताव ठेवल्यानंतर आम्ही त्यावर पोल मागितला. पोल दिला गेलेला नाही. सभागृहात भूमिका मांडू न देता त्यांनी रेटून हा प्रस्ताव मंजूर केला. त्याला आम्ही विरोध केला. हे सगळं होत असताना राज्याचे मुख्यमंत्री सभागृहात होते. सभापतींनी प्रत्यक्ष डायसवर न येता, त्यांनी तालिका सभापतींना बसवलं. त्यामुळे आम्ही आज सभापतींवरही अविश्वासाचा प्रस्ताव दाखल केलेला आहे. कारण त्यांनी सभागृहाचा विश्वास गमावला आहे. त्यामुळे त्यांना सभापती पदापासून दूर करावा, असा प्रस्ताव मांडला आहे", अशी प्रतिक्रिया अंबादास दानवे यांनी दिली.

# पंतप्रधान आवास योजनेसाठी भूमिहिनांकरिता 'लँड बँक'

## सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांची संकल्पना

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पंतप्रधान आवास योजनेचा लाभ गोरगरीब आणि भूमिहीन कुटुंबीयांना मिळण्यासाठी आणि ही योजना प्रभावीपणे अमलात येण्यासाठी सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी 'लँड बँक' ही अभिनव संकल्पना पुढे आणली आहे. यात सरकारी गायरान आणि शर्तभंग जमिनी घेऊन ही लँड बँक योजना हाती घेऊन लाभार्थ्यांना नाममात्र एक रुपये दराने पाचशे चौरस फूट आकाराचे भूखंड देण्याची कल्पना आहे. ही योजना शासनाने मंजूर केल्यास सोलापूरचा संपूर्ण राज्यात पथदर्शी प्रयोग ठरू शकतो.

यासंदर्भात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना लँड बँक योजनेची संकल्पना मांडली. याबाबत मुंबईत एका वरिष्ठ अधिकाऱ्याशी आपली प्राथमिक चर्चा झाल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले, सोलापूर जिल्ह्यात गावरान जमिनीसह शर्तभंग झालेल्या जमिनी उपलब्ध असून त्या ताब्यात घेण्यासाठी प्रक्रिया सुरू करता येईल. त्यादृष्टीने शर्तभंग जमिनीपैकी किती जमीन शासन जमा होऊ शकते, याची यादी तयार केली जाणार आहे. ही सर्व माहिती संकलित झाल्यानंतर




प्रत्यक्षात किती जमीन उपलब्ध होईल, हे पाहून पंतप्रधान आवास योजनेच्या लाभार्थ्यांना वाटप करण्याचे नियोजन आखले जाऊ शकते. ही योजना साकारली गेल्यास पंतप्रधान आवास योजनेची अधिक प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी शहरी आणि ग्रामीण भागात नव्याने जमिनीची शोधाशोध करण्याची गरज भासणार नाही, असे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी नमूद केले.

पंतप्रधान आवास योजनेत लाभार्थ्यांना पाचशे चौरस फूट आकाराचे भूखंडावर हक्काचे घर बांधता येणार असून यात ग्रामीण भागात निकषाप्रमाणे लाभार्थ्याला एक लाख ३० हजार रुपये तर शहरी भागात अडीच लाख रुपये अनुदान मिळते. परंतु जिल्ह्यात जे भूमिहीन आहेत, त्यांना पंतप्रधान आवास योजनेचा लाभ मिळण्यासाठी नाममात्र एक रुपये दराने पाचशे चौरस फूट जागा देण्याची संकल्पना आहे. यात सुमारे चार हजार कुटुंबांना लाभ होण्याची शक्यता आहे. यासंदर्भात परिपत्रक काढण्याचा मनोदय त्यांनी बोलून दाखवला आहे.

जिल्ह्यात सध्या पंतप्रधान आवास योजनेसाठी ९५४८९ अर्ज मंजूर झाले आहेत. त्यापैकी ४०१८२ अर्ज प्रत्यक्षात लाभार्थ्यांना योजनेचा लाभ झाला आहे. यात सर्वाधिक ६५३९ लाभार्थी सांगोला तालुक्यातील आहेत. तर ६४१५ लाभार्थी माळशिरसमध्ये आहेत. मंगळवेढा-५८९४, पंढरपूर-४४४२, करमाळा-३४०८, माढा-३१५८, अक्कलकोट-३१४६, दक्षिण सोलापूर-२४६५, मोहोळ-२२७३, बार्शी-१७२२, उत्तर सोलापूर-७२० याप्रमाणे लाभार्थी संख्या आहे.

# अजून किती दिवस पंढरपूरच्या जनतेने चंद्रभागेचं दूषित पाणी प्यायचं? - आ. अभिजीत पाटील

## नमामी चंद्रभागा फक्त कागदावरच का?

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** देशातील नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या नद्या शुध्दीकरणाचे काम हाती घेतले. त्याअंतर्गत 'नमामि गंगा'प्रमाणेच चंद्रभागा नदीचा 'नमामी चंद्रभागा' योजनेंतर्गत समावेश केला होता. मात्र राज्य सरकारने या संदर्भात कोणतेही ठोस पाऊल उचलले नसल्याने आज माढा विधानसभेचे आमदार अभिजीत पाटील यांनी नदीपात्रातील अशुद्ध पाण्यासंदर्भात राज्य शासनास धारेवर धरले. नमामि चंद्रभागा ही योजना कागदावरच राहिली असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे.

पंढरपूर तालुक्यातील चंद्रभागा नदीत पुणे, पिंपरी चिंचवड याठिकाणचे घाण पाणी



यासह नदी भागातील अनेक कारखाने तसेच नगरपालिकांचे सांडपाणी मिसळत आहे. अनेक उद्योगाचे केमिकल मिश्रित पाणी नदीत सोडले जाते. त्यामुळे नदी प्रदूषण मोठी डोकेदुखी बनले आहे. त्यामुळे जलचर प्राण्यांबरोबर नदीकाठच्या ग्रामस्थांच्याही आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. यासाठी केंद्र शासनाने नमामी चंद्रभागा या योजनेतून जिल्ह्यातील चंद्रभागा नदी थेट येर्णाया पाण्याचे शुध्दीकरण करुन ते पाणी नदी सोडण्याचा संकल्प केला होता. मात्र त्याकडेही दुर्लक्ष केले आहे.

विठ्ठल- रुक्मिणी दर्शनासाठी येणारा भाविक चंद्रभागेच्या घाण पाण्यात स्नान करतो यासाठी शासनाने ३४ कोटी ६५ लाख रुपये खचार्ची जलशुद्धीकरण यंत्रणा नदी पात्रात बसविली परंतु तीही कुचकामी ठरली आहे. पुणे, पिंपरी चिंचवड येथून उजनी धरणात येणार घाण पाणी बंद होणार काय? असा प्रश्नही आमदार पाटील यांनी विधानसभेत उपस्थित केला.


चंद्रभागा नदीच्या पाण्याची गुणवत्ता राखण्यासाठी सांडपाणी प्रक्रियेसाठी यंत्रणा उभारणे, भीमा नदी आणि तिच्या उपनद्यांमध्ये राडारोडा टाकण्यास प्रतिबंध करणे, नदीकाठ आणि पात्र यांचे संरक्षण, जतन आणि संवर्धन, नदीकाठावरील पूर रेषेतील विहिरींचे मॅपिंग अशी कामे प्राधान्याने हाती घेणे आवश्यक आहे. घाण पाण्यामुळे पंढरपुरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आहे. चंद्रभागा नदीच्या पाण्यावर या भागातील अनेक गावे अवलंबून आहेत आणि हेच दुषित पाणी पिण्यासाठी वापरल्यास आरोग्याच्या दृष्टीने भयावह आहे.नमामी चंद्रभागा योजना हि फक्त कागदावरच का? असा प्रश्न विधानभवनात उपस्थित केला.

**-आ. अभिजीत पाटील**

# पोलिस अर्लट! सोशल मीडियावरील आक्षेपार्ह मेसेजवर सायबर पोलिसांची नजर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नागपूर येथील घटनेनंतर सोलापूर शहर-ग्रामीण पोलिसांचा सायबर सेल अलर्ट झाला असून व्हॉट्सअ‍ॅप, फेसबूक, स्नॅपचॅट, इन्स्टाग्राम अशा सोशल मीडियावरील आक्षेपार्ह पोस्टवर दररोज २४ तास लक्ष ठेवले जात आहे. दोन समाजात, धर्मात तेढ निर्माण होणारी पोस्ट प्रसारित करणाऱ्यांवर प्रतिबंधात्मक कारवाई केली जात आहे.

सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्यावरील प्रतिबंधक कारवाईचा अधिकार आता सहायक पोलिस आयुक्तांकडून पोलिस उपायुक्तांकडे देण्यात आला आहे. एखाद्याने दुसऱ्याचे



ऐकून आक्षेपार्ह पोस्ट टाकल्यास चाप्टर केसनुसार त्या व्यक्तीकडून सहा महिने ते एक वर्षाचा चांगल्या वर्तनाचा बॉण्ड लिहून घेतला जातो. याशिवाय सतत आक्षेपार्ह पोस्ट टाकणारा सराईत असल्यास त्याच्याकडून दोन वर्षांचा बॉण्ड घेतला जातो. तरीदेखील बॉण्डचे उल्लंघन केल्यास जेवढ्या रकमेचा बॉण्ड, तेवढी रक्कम वसूल केली जाते. तरीदेखील, वर्तन सुधारले नाही तर गुन्हा नोंद करून गांभीर्य पाहून पुन्हा बॉण्ड घेतला जातो किंवा त्याच्यावर तडीपारीची कारवाई देखील होऊ शकते, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

### ...तर ग्रूप ॲडमिनवरही कारवाई

सोलापूर शहर सायबर पोलिसांनी सोमवारी (ता. १७) सोशल मीडियावर धार्मिक तेढ निर्माण होईल, अशा पोस्ट टाकल्याने त्यांची नावे सदर बझार पोलिसांना कळविली असून पोलिसांकडून त्यांच्यावर कारवाई केली जात आहे. दरम्यान, सोशल मीडियावर आलेली आक्षेपार्ह पोस्ट जाणीवपूर्वक डिलीट न करणारा किंवा त्या पोस्टची खात्री न करता दुसऱ्या ग्रुपला फॉरवर्ड करणाऱ्या ॲडमिनवर देखील कारवाई होऊ शकते. त्यामुळे अशा पोस्टवर ग्रूप ॲडमिनने लक्ष ठेवावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### संबंधितांवर होईल प्रतिबंधात्मक कारवाई

सोशल मडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकून दोन धर्मात तेढ निर्माण करणाऱ्यांवर विशेष लक्ष ठेवले जात असून त्यासाठी सोलापूर शहर पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली सोशल मीडिया कक्ष स्थापन करण्यात आला असून २४ तास कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून सोशल मीडियावर लक्ष ठेवले जात आहे. निगेटिव्ह पोस्ट टाकणाऱ्यांना पोलिस आयुक्तालयात बोलावून त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई केली जात आहे.

**- विजय कबाडे,** पोलिस उपायुक्त, सोलापूर शहर

# बार्शीच्या सराफ व्यापाऱ्यास ३८ लाख ४० हजारांचा गंडा

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** शहरातील मोहित अलंकार या सराफी दुकानातील सोन्याचे दागिने बनविण्यासाठी तसेच दुरुस्तीसाठी सोन्याची लगड कारागिरास देण्यात आली होती. त्याने सुमारे ३८ लाख ४० हजार रुपयांचे दागिने विकून जुगारामध्ये पैसे उडविल्याप्रकरणी बार्शी शहर पोलिस ठाण्यात कारागिराविरोधात गुन्हा दाखल



झाला आहे. शुभम वेदपाठक (रा. मंगळवार पेठ) असे गुन्हा दाखल झालेल्या कारागिराचे नाव आहे. संजय महादान्य (वय ४८, रा. नागणे प्लॉट) यांनी फिर्याद दाखल केली. ही घटना १५ नोव्हेंबर २०२४ ते १२ मार्च २०२५ दरम्यान घडली. फियार्दीत म्हटले आहे, शुभम वेदपाठक सराफ दुकानात सात-आठ वर्षांपासून दागिने बनविण्याचे सुवर्ण कारागीर म्हणून काम करीत आहे. सराफ तसेच ग्राहक त्यांच्याकडील चोख सोने देवून दागिने बनवत. १२ मार्च रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास शुभम दुकानात आल्यानंतर मागील एक ते दीड महिन्यात विश्वासाने दिलेले सोने (लगड) दे, ते ग्राहकास द्यायचे आहे, असे म्हटल्यानंतर त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. मला संशय निर्माण झाला ड्रॉवर त्याच्या चावीने उघडून तपासला असता सोने त्याच्याकडे मिळून आले नाही. सोन्याचे काय केले असे विचारताच सोने मोडले असून आलेले पैसे जुगारात गेले आहेत, असे त्याने सांगितले.२४ लाख ८४ हजार २४० रुपये किमतीचे २८२ ग्रॅम ३०० मिली सोन्याची लगड, ४ लाख ४० हजार रुपयांच्या ५० ग्रॅम सोन्याच्या पाटल्या, २ लाख ७२ हजार ८०० रुपयांचे ३१ ग्रॅम वजनाचे (पान 2 वर..)

# नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांना 31 मार्चपर्यंत नुकसान भरपाई देणार - कोकाटे

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** नैसर्गिक आपत्तीमुले बाधित शेतकऱ्यांना देय असलेली नुकसान भरपाई देण्याचा कार्यक्रम राज्य शासनाने १०० दिवसांच्या कृती आराखड्यात समाविष्ट केला आहे. यानुसार शेतकऱ्यांना शेत पिकांच्या नुकसान भरपाईपोटी त्यांना देय असलेली रक्कम ३१ मार्चपर्यंत दिली जाईल, असे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी विधानसभेत लक्षवेधीच्या उत्तराप्रसंगी सांगितले.

परभणी जिल्ह्यासह मराठवाड्यातील शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान पीक विम्याची रक्कम मिळावी या संदर्भात सदस्य राजेश विटेकऱ्यांनी लक्षवेधी उपस्थित केली होती. त्या लक्षवेधीच्या चर्चेत सदस्य राहुल पाटील व सई डहाके यांनीही सहभाग घेतला. राज्य शासन शेती व शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचे सांगून मंत्री श्री. कोकाटे यांनी सांगितले, नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस व पूर परिस्थितीमुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई त्यांना तातडीने देण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद केली आहे.

मंत्री श्री. कोकाटे यांनी सांगितले, परभणी जिल्ह्यात खरीप २०२४ मध्ये प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत ७ लाख ६३ हजार ६२ शेतकऱ्यांनी सहभाग घेऊन ५ लाख २३ हजार ८५८ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित केले. नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस व पूर परिस्थितीमुळे जिल्ह्यातील एकूण पीक पेरलेल्या क्षेत्राच्या २५ टक्के पेक्षा जास्त क्षेत्र बाधित झाले. त्यामुळे परभणी जिल्हाधिकारी यांनी अधिसूचना जारी करून बाधित शेतकऱ्यांना २५ टक्के अग्रिम नुकसान भरपाई देण्याचा निर्णय घेतला.

परभणी जिल्ह्यात खरीप २०२४ मध्ये हंगाम प्रतिकूल परिस्थिती, नैसर्गिक आपत्ती व काढणी बचत नुकसान या जोखीम बाबीकरिता ४२६.५५ कोटी अंतिम नुकसान भरपाई मंजूर झाली आहे. तर परभणीसह मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांकरता प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत १७३४.२६ कोटी नुकसान भरपाई मंजूर झाली आहे. जानेवारी ते डिसेंबर २०२४ या कालावधीत परभणी जिल्ह्यात नैसर्गिक आपत्तीमध्ये ४ लाख १० हजार ३५ हेक्टर क्षेत्र बाधित झाले. यासाठी ४७३.४४ कोटी निधी मंजूर झाला असून ४१७. १२ कोटी निधी वितरित करण्यात आला आहे.

तर मराठवाड्यात जानेवारी ते डिसेंबर २०२४ या कालावधीत ३३ लाख ९७ हजार ८९१ हेक्टर क्षेत्र बाधित झाले. यासाठी ३०६७. ५२ कोटी निधी मंजूर झाला असून २४५८.६२ कोटी निधी वितरित करण्यात आला आहे. राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत खरीप हंगाम २०२४ साठी २१९७. १५ कोटी नुकसान भरपाई मंजूर झाली आहे. विमा कंपन्यांना राज्य हिस्सा विमा हप्ता अनुदान उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरू असल्याचे मंत्री श्री. कोकाटे यांनी सांगितले.


## पाहिजेत

दैनिक सोलापूर कटूसत्य | सोलापूर वृत्तदर्पण

सोलापूर वृत्तदर्पण व दैनिक कटूसत्य या माध्यमांच्या वतीने एक अभिनव व अनोखी योजना राबविण्याचा संकल्प आहे. त्यासाठी सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभागात व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात कायम पगारावर खालील पदे भरावयाची आहेत. या करीता सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभाग, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, पंढरपूर, माळशिरस, सांगोला, मंगळवेढा या तालुका परीसरात एक प्रतिनिधी नेमणे आहेत. ही योजना यशस्वी करण्यासाठी खालील पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | लिंग | पगार/मानधन व कमिशन (मासिक) | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | व्यवस्थापक | २ | एम. बी.ए./ पदवीधर | स्त्री/पु | १५००० ते २०००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| २) | सहाय्यक व्यवस्थापक | ४ | एम. बी.ए./ पदवीधर | स्त्री/पु | १०००० ते १५००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| ३) | सह संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ४) | उप संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ५) | पत्रकार / वार्ताहर | २५ | १२ वी ते पदवीधर | स्त्री/पु | ३००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ६) | कॅमेरामन | २५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ३००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ७) | मार्केटींग प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ८) | जाहिरात प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ९) | प्रशिक्षण अधिकारी | १ | एम. बी.ए. / पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| १०) | वसूली प्रतिनिधी | ५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |

**नियम व अटी :-** १) इच्छूक उमेदवारांनी आपल्या स्वहस्ताक्षरात संपूर्ण माहिती असलेला अर्ज भरून, त्या सोबत शाळेचा दाखला, मार्कलिस्ट, भारतीय असल्याचा पुरावा, दोन फोटो जोडून, खालील पत्त्यावर १५ दिवसाच्या आत आणून द्यावे. २) वयोमर्यादा १८ वर्ष पूर्ण ते ४५ वर्षापर्यंत, एक उमेदवार दोन पदासाठी अर्ज करु शकतो. ३) सर्व अधिकार वृत्तदर्पण कडे राखीव राहतील आणि ते अर्जदारांवर बंधनकारक राहतील. वृत्तदर्पण चा निर्णय अंतिम राहील. ४) सदरच्या नियुक्त्या केवळ मुलाखती घेऊनच केल्या जातील. आमच्या व आपल्या वेळेनुसार मुलाखत घेतली जाईल. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी. ५) अर्ज स्वीकारण्याची वेळ रविवार सोडून सकाळी १० ते सायं. ६ वाजेपर्यंत. ६) मुलाखतीनंतर निवड झालेल्या सर्व उमेदवारांना मोफत प्रशिक्षण दिले जाईल. ७) स्वतःचे वहान असणाऱ्यास प्राधान्य.

फोन : 0217-2605091 मो.9657069069

संपर्क :- वृत्तदर्पण कार्यालय, एफ-३, वृंदावन पार्क, चेतन फॉन्ड्रीसमोर, होटगी रोड, सोलापूर-३.

## संपादकीय

# नद्या स्वच्छतेचे तीन तेरा

वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण, शहरीकरण यामुळे नद्यांचे प्रदूषण वाढत आहे. विशेषतः महाराष्ट्रातील गोदावरी, भीमा, पंचगंगा या नद्यांमध्ये प्रदूषणाची पातळी चिंताजनक बनली आहे. भारतातील नद्यांमधील प्रदूषणाचे प्रमाण मोजण्यासाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ वेळोवेळी अभ्यास आणि अहवाल प्रकाशित करते. या अहवालांनुसार, देशभरातील 351 नद्या अत्यंत प्रदूषित असून 45 नद्या महाराष्ट्रातील आहेत, ज्या 'गंभीर प्रदूषित' गटात मोडतात. नीती आयोगाच्या अहवालानुसार 2030 पर्यंत पिण्यायोग्य पाण्याचा तुटवडा निर्माण होऊ शकतो, याचे एक कारण म्हणजे जलप्रदूषण. नीती आयोग व प्रदूषण मंडळाच्या संयुक्तिक अहवालानुसार, गंगा, यमुना यांसारख्या नद्यांमध्ये जैविक ऑक्सिजनची पातळी अत्यंत कमी आहे. त्यामुळे जलचरांचे अस्तित्व धोक्यात आहे.

नदीप्रदूषणाची पाच प्रमुख कारणे अभ्यासांमधून दिसून आली आहेत. एक म्हणजे औद्योगिक कचरा. देशातील औद्योगिक क्षेत्रांतून रासायनिक सांडपाणी नद्यांमध्ये मिसळत असून त्यामुळे नद्यांचे पाणी विषारी बनत आहे. याखेरीज शहरे आणि गावांतून नद्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर मैला सोडला जातो. अनेक नद्यांमध्ये प्लॅस्टिकचा ढीगही वाढत चालला असून यामुळे नद्यांमधील परिसंस्थेची हानी होत आहे. शेतीमधील कीटकनाशके, रासायनिक खतांमुळेही जलप्रदूषण वाढत आहे. याखेरीज मूर्ती विसर्जन, पूजेचे साहित्य टाकणे यामुळेही नदीप्रदूषण वाढत आहे. अलीकडेच जलशक्ती मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, सांडपाणी व्यवस्थेतील त्रुटींमुळे नद्यांचे प्रदूषण दूर करण्यात अपेक्षित यश मिळत नाहीये. वस्तुतः या माहितीत नवीन काही नाही. किंबहुना, हे वास्तव वेळोवेळी समोर येत आहे. नद्यांच्या काठावर वसलेल्या शहरांच्या सांडपाणी व्यवस्था सुधारण्याचे काम पूर्ण होत नाही ही निराशाजनक आणि चिंताजनक आहे. नदीकाठावर वसलेल्या शहरांतील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प पूर्ण क्षमतेने काम करत नाहीत, हे कुणापासून लपून राहिलेले नाही. काही ठिकाणी त्यांची क्षमता इतकी कमी आहे की त्यांना गटारातील घाण पाण्यापैकी निम्मे पाणीही प्रक्रिया करता येत नाही. दुसरी समस्या अशी की ही संयंत्रे खराब झालेली आहेत.

वास्तविक पाहता, आपापल्या राज्यांमध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प पुरेशा संख्येत आहेत की नाही आणि असणारे प्रकल्प पूर्णक्षमतेने काम करताहेत की नाही हे पाहण्याची जबाबदारी राज्य सरकार आणि त्यांच्या स्थानिक स्वराज्य संस्थांची आहे; परंतु त्यांचे काम नीट होत नाहीये हे लक्षात आल्यानंतर केंद्र सरकारने राज्यांवर दबाव आणला पाहिजे. यात विलंब होता कामा नये. कारण, अनेक शहरांतील घाण नाले अद्याप सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांना जोडलेलेही नाहीत. त्यामुळे घाण नाल्यातील कचरा थेट नद्यांमध्ये जात आहे. केंद्र आणि राज्य सरकारने ज्या नद्या प्रदूषणमुक्त करण्याचे वचन दिले होते, त्या नद्यांचाही प्रदूषित नद्यांच्या यादीत समावेश आहे, ही बाब अधिक गंभीर म्हणावी लागेल. सर्व नाले सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांना जोडण्याबाबत आणि त्यातून कोणत्याही परिस्थितीत घाण पाणी नद्यांमध्ये जाणार नाही, यासाठी कोणतीही कालमयार्दा निश्चित का केली जात नाही? याबाबत कोणताही ठराव का केला जात नाही? हा प्रश्न अनाकलनीय आहे.

नद्यांच्या प्रदूषणाचे आणखी एक प्रमुख कारण म्हणजे त्यांच्या काठावर उभारलेल्या उद्योगांकडून सोडले जाणारे रसायनमिश्रित पाणी. याला कारणीभूत आहे सरकारी यंत्रणांचा नाकर्तेपणा. औद्योगिक कचरा नद्यांमध्ये जाऊ नये हे पाहण्यासाठी आणि त्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी या यंत्रणांची निर्मिती केली गेली असूनही त्या कुचकामी ठरत आहेत. मध्यंतरीच्या काळात केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने नद्यांमध्ये विषारी कचरा टाकर्णाया 73 उद्योगांना टाळे ठोकण्याचे आदेश दिले होते. पण एवढ्यावर समाधान मानता येणार नाही.

नदीकाठावर स्थापन झालेल्या सर्व उद्योगांचे सांडपाणी प्रक्रिया करूनच नद्यांमध्ये सोडले गेले पाहिजे. अन्यथा, नद्या प्रदूषणमुक्त करण्याची मोहीम हा केवळ फार्सच ठरेल. वाढती लोकसंख्या, शहरीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे नदीप्रदूषण टिपेला पोहोचले आहे. अशा स्थितीत सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प कार्यक्षमतेने कार्यरत होण्याची गरज अधिक तीव्र झाली आहे. या समस्येचे निराकरण करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी गांभीर्याने पावले टाकणे गरजेचे आहे.

नद्या या केवळ जलस्रोत नसून अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. शेकडो वर्षांपासून जलसिंचन आणि व्यापारासाठी नद्यांचा वापर केला जात आहे. कृषी क्षेत्रासाठीही पाणी नद्यांमधून वापरले जाते. देशाचे अन्नभांडार असर्णाया पंजाब-हरियाणा या राज्यातील कृषिव्यवस्था नद्यांवरच अवलंबून आहे. इतिहासात जसा नद्यांनी मानवी संस्कृतीला आधार दिला, तशाच प्रकारे भविष्यातही या नद्यांचे संवर्धन करणे गरजेचे आहे. यासाठी जलप्रदूषण टाळणे, जलसंवर्धन करणे आणि नद्यांचे पुनरुज्जीवन करणे यावर सर्वाधिक भर देणे आवश्यक आहे. कारण प्रदूषित नदीपाणी आरोग्य, पर्यावरण, शेती, उद्योग आणि संपूर्ण समाजावर नकारात्मक परिणाम करत आहे.

प्लॅस्टिक पिशव्या, थमाकील आणि इतर कचरा नद्यांमध्ये टाकल्याने पाण्याची गुणवत्ता खालावत चालली आहे. प्रदूषित पाणी प्यायल्याने डायरिया, कॉलरा, टायफॉइड, हिपॅटायटीस यांसारखे आजार वाढताहेत. औद्योगिक प्रदूषणामुळे कर्करोग आणि त्वचारोग होण्याचे प्रमाण वाढते, असे दिसून आले आहे. दूषित पाण्यातील घातक द्रव्यांमुळे मुलांमध्ये मुडदूस (रिकेट्स) आणि इतर कुपोषणाचे विकार आढळतात. जलप्रदूषणामुळे नदीतील जलचर जीवसृष्टी कमी होत आहे. जलप्रदूषणामुळे नदीपाण्यातील ऑक्सिजनचे प्रमाण कमी होऊन माशांसारखे जलीय जीव मोठ्या प्रमाणावर कमी होताहेत. दूषित पाणी शेतीसाठी वापरल्याने पीकांची गुणवत्ता खालावते आणि उत्पन्न कमी होते. मातीतील सूक्ष्मजीव नष्ट होऊन जमीन नापिक होते.

या पार्श्वभूमीवर जलप्रदूषण नियंत्रण कायदा (1974)ची काटेकोर, कठोर आणि प्रभावीपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. यामध्ये धार्मिकता, राजकारण, अर्थकारण अशा कोणत्याही मुद्द्यांचा अडसर बाजूला ठेवला गेला पाहिजे. सरकारच्या प्रयत्नांसोबत नागरिकांचाही सक्रिय सहभाग महत्त्वाचा आहे. प्रदूषण रोखण्यासाठी उद्योग, शहरे आणि सामान्य जनता यांसह सर्वच घटकांनी आपापली जबाबदारी ओळखून त्यानुसार वर्तन केल्यास नद्या पुन्हा स्वच्छ आणि जीवनदायी बनू शकतात.

पान १ वरून

## बार्शीच्या सराफ व्यापाऱ्यास...

सोन्याचे गंठन, अंगठी, फुले, झुबे, ८३ हजार ७२ रुपयांचे ९ ग्रॅम ४४० मिली सोन्याची लगड, ४४ हजार रुपये किमतीचे पाच ग्रॅम सोन्याचे झुबे टॉप्स, ६१ हजार ६०० रुपये किमतीचे सात ग्रॅमचे टॉप्स, ३९ हजार ६०० रुपये किमतीचे ४ ग्रॅम ५०० मिली सोन्याचे झुबे टॉप्स, ३० हजार ८०० रुपये किमतीचे तीन ग्रॅम ५०० मिली सोन्याचे झुबे टॉप्स, २ लाख ८४ हजार २४० रुपये किमतीचे ३२ ग्रॅम ३०० मिली सोन्याचे गंठन, एक लाख रुपये दुकानातील रोख रक्कम, असा एकूण ३८ लाख ४० हजार ३५२ रुपयांचा ४२५ ग्रॅम ४० मिली सोने मोडून वेदपाठकने पैसे जुगारात उडविल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

## प्रबोधन

# कायदा गाढव असतो!

कायदा गाढव असतो हे वाक्य उच्चारणाऱ्यांची संख्या समाजात फार मोठी नसेल, पण बरीच शहाणी माणसं तसं म्हणताना आढळतात. न्यायसंस्था ही तर फक्त कायद्याच्या आधारावरच उभी असते. म्हणजे न्यायसंस्था गाढवावर बसलेली असते काय? कायदा गाढव असतो मग कायदेतज्ज्ञ, कायदेपंडित यांना त्याच परिभाषेत संबोधता येईल काय? पुस्तकात जसं लिहिलं असेल तसं वर्तन कायदा (पक्षी कायदा वापरणारे) आपलं डोकं न वापरता करतो म्हणून त्याची गणना गाढवात केली जाते. मानवी जगात तत्त्व आणि व्यवहार या दोन गोष्टींची सांगड घातली जावी, अशी अपेक्षा असते. जेव्हा तसं होत नाही, तेव्हा कायद्याचा गाढवपणा जगजाहीर होतो. कायद्याचं एक पायाभूत तत्त्व नेहमी सांगितलं जातं की, 'शंभर अपराधी सुटले तरी चालेल पण एकाही निरपराधी व्यक्तीला शिक्षा होता कामा नये. '

कायद्याला गाढवाचं स्वरूप येण्याला हे तत्त्व फार कारणीभूत ठरलं आहे. परिणामी, झालंय काय तर शंभर गुन्हेगार निर्दोष म्हणून सोडले जातात आणि शंभर गुन्हेगारांनी शंभर निरपराध्यांमागे कोर्टकचेऱ्या, वकील फीचा भुर्दंड, सोन्यासारख्या आयुष्याचं न्यायालयाच्या कोंडवाड्यात कुजणं, मनोदुर्बलतेचं वरदान देतात. ही त्रस्त माणसं पंधरा-वीस मिनिटांनी एकदा उसासे टाकतात. ह्या उसाशाचे शब्द असतात, कायदा गाढव असतो.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात कायदा म्हणजे अगदी कायदाच होता. म्हणूनच लांज्याच्या पाटलाला स्त्रियांवर केलेल्या अत्याचाराबद्दल त्याचे हातपाय तोडण्याची योग्य शिक्षा तात्काळ देऊन महाराजांनी दीनदुबळ्यांना अभय दिलं. त्यांच्या काळात धार्मिक तत्त्वज्ञानाचा पगडा प्रचंड प्रमाणात होता आणि लबाड धर्मशास्त्र्यांनी ब्राह्मणाचा वध करणाऱ्यास ब्रह्महत्येचं पातक लागण्याचं भय लोकमानसात खोलवर पेरून ठेवलं होतं. पण अफजलखानाचं पोट शिवराजांनी फाडून त्याला ठार केल्यावर खानाच्या वकिलाने कृष्णाजी भास्कर कुलकर्ण्याने महाराज आपणावर शस्त्र चालविणार नाहीत, ब्रह्महत्येला घाबरतील असं वाटूनच त्यांच्यावर तलवारीचा वार केला होता. पण महाराजांनी धर्मशास्त्रांचा, पर्यायाने कायद्याचा-गाढवपणा झुगारून कृष्णाजीला एकाच घावात ठार केलं. कायद्याचा गाढवपणा कुठवर चालू द्यायचा हे त्यांना माहीत होतं.

पेशवाईत राघोबाने आपल्या पुतण्याचा- नारायणराव याचा खून केला. न्यायमूर्ती रामशास्त्री प्रभुणे यांनी कोठे तो खून प्रत्यक्ष हजर राहून पाहिला होता ? पण घटना घडून गेल्यावर त्यांनी खुन्याचा शोध मोठ्या कसोशीने घेतला आणि राघोबानेच हा खून गारद्यांच्या हस्ते करवल्याची खात्री पटल्यावर भर दरबारात राघोबाला देहान्त प्रायश्चित्त फर्मावलं. याला म्हणतात न्याय!

प्रत्येक धर्माचे धर्मग्रंथ हीसुद्धा कायद्याचीच पुस्तकं आहेत. अशा धर्मग्रंथांची विधी आणि निषेध अशी दोन अंगं किंवा विभाग असतात. त्या त्या धमार्नुयायांनी काय करावं आणि काय करू नये, हे त्यातून स्पष्ट केलेलं असतं. धमार्चार्य किंवा धर्मगुरू धर्मग्रंथातील आज्ञांच्या आधारे उपदेश करतात. हे धर्मग्रंथ जुने आहेत. त्या जुन्या काळातील समाजाच्या रचनेनुसार, स्थितीनुसार, गरजांनुसार धर्मग्रंथ लिहिलेले नसून विशिष्ट धर्माच्या अस्तित्वासाठी प्रचारासाठी, संगठनासाठी ते नियम केलेले आहेत. आज ते नियम अधिकच कालबाह्य झालेले आहेत. त्यांच्यात बदल करणं गरजेचं आहे. पण ही कायद्याची पुस्तकं अपौरुषेय असल्याचं मानलं गेल्याने त्यांच्यात सुधारणा करणं, नवे नियम घालणं, जुने काढून टाकणं होत नाही. म्हणूनच डॉ. आंबेडकरांनी मनुस्मृती जाळून तिच्या गाढवपणाला आपल्यापुरतं हद्दपार केलं आणि त्यामुळेच तो कायदा गाढव होता हेच अधिक स्पष्ट झालं. आज तुरुंगात पवित्र पापी अर्थात, काही सज्जन शिक्षा भोगत आहेत. ते बिचारे केवळ भावनेच्या आवेगाने गुन्हेगार ठरलेत. माणूस म्हणून जगण्याचा आपला अधिकार भोगण्याच्या आड येणाऱ्या दुष्ट प्रवृत्तींना त्यांनी निसर्गदत्त आवेगाने दूर केलं. न्यायाधीशांना अशा सत्शील व्यक्तींची परिस्थिती आणि मनःस्थिती जाणता आलेली नाही. म्हणूनच तर कायदा गाढव असतो हे वाक्य सारासार विचार करणाऱ्यांच्या तोंडून ऐकायला मिळतं! म्हणून-

कायद्याने व्हावे । लोकांचे रक्षण
लोकांचे भक्षण । होऊ नये ॥१
कायदा असावा। प्रगल्भ बुद्धीचा
लेप वरवरचा । असू नये ॥२
समाज घेतसे । नित्य नवे रूप
दिसावे स्वरूप। कायद्यात ॥३
बिलंदर व्यक्ती। शोधी पळवाट
कायदा बिकट। हवा त्यास ॥४
धाक कायद्याचा। वाटावा सर्वांना
नको पयार्यांना। जागा तेथे ॥५
आज उभे आहे । न्यायाचे बुजगावणे
काहीही त्याच्याने । साध्य नाही ॥६
बोथट धारेचे । शस्त्र न्यायसंस्था
लोणीही कापता । नये त्याने ॥७
दोषी निर्दावले । सज्जन खचले
कायद्याचे झाले। मढे आज ॥८
अन्यायाची चीड । नाही न्यायाधीशा
दाटल्यात दिशा । अंधाराने ॥९
न्यायाचा हा दिवा। विझू विझू पाहे
आवश्यक आहे। तेजाळणे ॥१०



प्रा. डॉ. जे. बी. शिंदे
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

## प्रबोधन

# ज्ञान हा सागर । अगाध सुखाचा

'ज्ञान ही शक्ती आहे. पण अज्ञान हे वरदान आहे.' Knowledge is Power but ignorance is bliss, अर्थात, हा मूळचा इंग्रजी भाषेतील विचार एखाद्या मुरब्बी राजकारण्याच्या तोंडी शोभून दिसावा, असा चलाखीचा आहे. कारण त्यात ज्ञानी शहाण्यांचाही जयजयकार केलेला आहे आणि अज्ञानी लोकांचीही खुशामत केलेली आहे. या विचारमांडणीत पुन्हा एक धूर्तपणा लपलेला आहे. ज्ञानी माणसांपेक्षा अज्ञानी माणसांची संख्या मोठी असते, हे हेरून या विचारकर्त्यानें अज्ञानाच्या पारड्यात वरदान टाकलं आहे. हे वरदान शक्तीच्या तुलनेने वादातीत सरस असतं, हे सांगण्याची गरज नाही. तरी बरं, शहाणी माणसं वरदानस्वरूप अज्ञानच बरं, असं न म्हणता आपल्या नव्या पिढीला ज्ञानाची शक्ती अधिकाधिक कशी मिळेल, ते पाहातात. पण अज्ञान हे वरदान आहे, हा विचार मात्र घातक बुद्धिभेद करणारा आहे, यात वाद नाही.

खरं तर, अज्ञान हे वरदानही नाही आणि अज्ञानात आनंदही नसतो. संस्कृत सुभाषितकारांनी तर साहित्य, संगीत, विविध कलाप्रकार, काव्यचित्रांमधील कलाजन्य मर्मबोध यांची गंधवार्ता ज्या अज्ञानी माणसात नसते, तो शेपूट आणि शिंगं नसलेला पशूच होय, असं उगीच म्हटलेलं नाही. पाश्चात्त्य कांदबरीकार जेन ऑस्टिन म्हणतात, 'जगातील निम्म्याअर्ध्या लोकांना अज्ञानामुळे दुसऱ्यांचा आनंद कळतच नाही.' याचा अर्थ, ते आनंदबोधाला मुकलेलेच असतात. हे असतं त्यांचं बाह्य जग. बरं, त्यांचं आंतरिक जग तरी आनंदी असेल म्हणावं, तर तिथेही आनंदाच्या नावाने आनंदच असतो. एका विचारवंताने अज्ञानी माणसांचा हा दैवदुर्विलास विशद करताना म्हटलं आहे, 'दुःखात आणि अशांतपणात जन्म घालवणारी अशी बरीच माणसं जगात आहेत की, त्यांना आपल्या हृदयात आनंदाचा सागर उचंबळत आहे, याची कल्पनाच नसते. '

जशी अज्ञानी माणसं आनंदाला पारखी होतात, तशीच व्यक्तशीरपणाला बळी पडलेली काही माणसंसुद्धा घड्याळाच्या काट्यात अडकून त्रस्त झालेली दिसून येतात. Time is money हा त्यांचा प्रियतम ध्यास असतो. जीवनातील थोडाही वेळ आनंदात घालवणं, हा फार मोठा अपराध आहे, असं समजणारे हे लोक, 'Work while you work and play while you play, That is the way to be happy and gay', हा संदेश साफ विसरून जीवनाच्या आनंदाला पारखं होतात. त्यांनी इंग्लंडचे विचारवंत बड रसेल काय म्हणतात ते जरा समजून घ्यावं. रसेल म्हणतात, 'जो वेळ खर्च करण्यात तुम्हाला आनंद वाटतो, तो वेळ फुकट गेला, असं म्हणता येत नाही. '

समाजातील सज्जन व्यक्ती सद्गुणी, समंजस, निरुपद्रवी असतात. पण त्या नको तितक्या गंभीर प्रकृतीच्या असतात. भविष्याची अकारण चिंता, जीवनाच्या क्षणिकतेचा बोध, काल्पनिक संकटांचं भय त्यांना गंभीर बनवतं. त्यामुळे ते दुःखी आणि तुसडे होत जाऊन निराशाग्रस्त होतात. त्यांच्याकडून वेगळी अपेक्षा बाळगताना विचारवंत अशर म्हणतात, 'चांगली माणसं, सज्जन माणसं आनंदी आणि प्रेमळ होतील, तर समाजाचं केवढं तरी कल्याण होईल.' तसं झालं तर जगाचं दुप्पट कल्याण होईल. आनंदी झाल्याने सज्जनांचं आणि त्यांच्यामुळे जगाचं काळवंडलेलं चित्र गुलाबी व्हायला वेळ लागणार नाही.

जगाच्या इतिहासाचा तत्त्वज्ञानी कार्लाईल यांनी काढलेला आनंदवाचक निष्कर्ष फक्त ज्ञानी माणसांनाच कळेल असा आहे. ते म्हणतात, 'आनंदीपणाची शक्ती अमर्याद आणि टिकाऊ असते, अशा व्यक्ती दीर्घकाळ टिकणारी कामं करतात.' कार्लाईल याच्या निष्कर्षाला बढावा देत पाश्चात्त्य विद्वान ओविडही म्हणतात, 'आनंदाने उचललेलं ओझं जड असलं, तरी हलकं वाटतं?' बऱ्याच लोकांना शक्यतो तीच तीच कामं सतत करावी लागतात. त्यामुळे प्रत्येक वेळी कामात आनंद वाटणं कसं शक्य आहे? पण त्यांनी, कामात आनंद नसला तरी, काम न करण्यात तर मुळीच आनंद नसतो, असा मनोबोध स्वीकारायला नको का?

ज्ञानी माणसाचं कर्तव्याचं भान चांगलं असतं. त्यामुळे स्वीकृत कार्यात रस घेऊन तो सतत आनंदातच मग्न होतो. ही आनंदी वृत्ती पाश्चात्त्य आहे. स्टिव्हन्सन हे विचारवंत, 'आनंदी असणं हे आमचं कर्तव्य आहे, आनंदी माणूस जगावर उपकार करतो. ' अशी समाजनिष्ठा व्यक्त करतात. भारतात कर्तव्यप्रेमी माणसं दुर्मिळ आहेत, हे वास्तव आहे. काम, कर्तव्य, सेवा, चाकरी यांच्याकडे वाट्याला आलेले नशिबाचे भोग, असं जर आपण मानत असू, तर दोन्ही पक्षी आनंदाचा ठणठणाट होणार, हे नक्की. 'आनंद हेच ब्रह्म आहे, आनंद हेच खरं ज्ञान आहे,' असं उपनिषद मानतं. ते पाश्चात्त्यांना कळलं. आम्हाला मात्र ते कळलं नाही, हे आमचं अधःपतन नाही का? म्हणून लक्षात घ्या-

ज्ञानामध्ये शक्ती। वसते निश्चित
ज्ञानात आनंद। असे मोठा ॥ १
ज्ञानी माणसाला । दुःख न बाधते
त्याच्या मागे जाते। सुख नित्य ॥२
ज्ञान हा सागर । अगाध सुखाचा
पारावर त्याचा । आढळेना ॥ ३
ज्ञानियाने सदा । आनंद वाटावा
समाजाला द्यावा । लाभ त्याचा ॥४
ज्ञानी तोच खरा । वृत्तीचा प्रसन्न
हर्ष हेच अन्न। जीवनाचे ॥५
अज्ञानात दुःख । अज्ञानात त्रास
मना लागे फास । अज्ञानाने ॥ ६
ज्ञानाची साधना । करा अविरत
जोडोनिया हात। उभे भाग्य ॥७
सोडवा मूढांना। त्रासातून नित्य
आनंदाचे तत्त्व। सांगा लोका ॥८



प्रा. डॉ. जे. बी. शिंदे
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# मानव मुक्तीचा सत्याग्रह

२० मार्च हा दिवस भारताच्या सामाजिक इतिहासाला कलाटणी देणारा दिवस आहे. कारण याच दिवशी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी रायगड जिल्ह्यातील महाड येथील चवदार तळ्यावर अस्पृश्यांना पाणी घेता यावे म्हणून सत्याग्रह केला. हा महाडचा सत्याग्रह, चवदार तळ्याचा सत्याग्रह किंवा मानव मुक्तीचा सत्याग्रह म्हणून ओळखला जातो. म्हणूनच २० मार्च हा दिवस भारतात सामाजिक सबलीकरण दिन म्हणून साजरा केला जातो. हा सत्याग्रह फक्त महाराष्ट्रालाच नाही तर जगाला प्रेरणा देणारा ठरला. पाणी ही नैसर्गिक संपत्ती आहे. तिच्यावर सर्वांचा समान हक्क असताना त्या काळच्या जातीय व्यवस्थेने मुख्य स्रोतातून पाणी घेण्यास व रस्त्यावरुन जाण्यासही अस्पृश्यांना बंदी घातली. ४ ऑगस्ट १९२३ साली ब्राह्मणेतर पक्षाचे नेते सी के बोले यांनी मुंबई कायदे मंडळात एक कायदा पास करुन घेतला. त्यानुसार सरकारी खचार्ने बांधलेल्या व सुस्थितीत असलेल्या मालमत्तेवर म्हणजे पाणवठे, धर्मशाळा, बगीचे यावर सर्वांचाच म्हणजे अस्पृश्यांचा देखील अधिकार असेल. जानेवारी १९२४ साली महाडच्या नगरपालिकेने या कायद्याची अंमलबजावणी करण्याचा ठराव केला. या ठरावानुसार नगरपालिकेने महाडचे चवदार तळे अस्पृश्यांसाठी खुले केल्याचे जाहीर केले. परंतु स्पृश्यांनी अस्पृश्यांना या तळ्यातून पाणी भरू दिले नाही. त्यामुळे अस्पृश्यांमध्ये धाडस आणि आत्मविश्वास निर्माण करू देण्यासाठी व त्यांचा हक्क त्यांना मिळवून देण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी चवदार तळ्यातील पाण्यासाठी सत्याग्रह करण्याचे ठरवले. बाबासाहेबांनी १९ आणि २० मार्च या दिवशी महाडमधील कुलाबा येथे परिषद भरवली. या परिषदेचे अध्यक्ष स्वतः बाबासाहेब हे होते. या परिषदेस सुरेंद्र चिटणीस, संभाजी गायकवाड, अनंत चित्रे, रामचंद्र मोरे, गंगाधर पंत सहस्त्रबुद्धे हे दलितेतर व ब्राह्मण नेते उपस्थित होते. या परिषदेत अस्पृश्यतेचा धिक्कार करुन काही ठराव करण्यात आले ते असे

१) स्पृश्यांनी अस्पृश्यांना आपल्या नोकरीत ठेवावे.

२) स्पृश्य लोकांनी अस्पृश्य लोकांचे नागरिकत्वाचे अधिकार मान्य करावेत.

३) मृत जनावरे ज्याची त्याने ओढवित

४) स्पृश्यांनी अस्पृश्य विद्यार्थ्यांना वार लावून जेवण द्यावे.

याच परिषदेत असेही ठरले की सवार्नी दुसऱ्या दिवशी म्हणजे २० मार्च रोजी महाडच्या चवदार तळ्यातील पाणी प्यावे. त्यानुसार दुसऱ्या दिवशी परिषदेस उपस्थित असणारे सर्व नेते व परिषदेस आलेले सर्व जण चवदार तळ्यावर गेले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वप्रथम या तळ्यातील पाणी ओंजळीने प्यायले. त्यावेळी स्त्री पुरुष ५००० लोक या परिषदेस व त्यानंतर चवदार तळ्यावर पाणी पिण्यासाठी आले. त्यातील पुरुष हे हातात काठी घेऊन आले होते. हातात काठी म्हणजे महार जातीच्या पुरुषाचे चिन्ह होते. चवदार तळ्याचे पाणी पिऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांना मुक्तीचा मार्ग दाखवला. पण, ही मानवतावादी घटना रूढीवादी स्पृश्य हिंदूंना सहन झाली नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर सरकारी बंगल्यात परत गेल्यावर जातीयवादी, सनातनी विचारांच्या लोकांनी गावात अफवा उठवली की, चवदार तळे बाटवल्यानंतर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील जमाव विश्वेवश्वराच्या मंदिरात जाऊन मंदिरही बाटवणार आहेत. धर्म धोक्यात आल्याचे उच्चवर्णीय, सनातनी हिंदूंनी गावभर पसरवले त्यातून जातीयवादी उच्च हिंदूंचा एक घोळका हत्यारे, लाठ्याकाठ्या घेऊन सभास्थानी आला. त्यांनी सभेनंतर गावाकडे जाण्यापूर्वी जेवण करीत असणाऱ्या अस्पृश्यांना मारहाण केली. त्यांच्या जेवणात माती मिसळली. विश्वेवश्वराच्या मंदिरात प्रवेश करण्याचा कट रचला आहे अशी अफवा उठवल्यामुळे गावातील सनातनी हिंदूंनी सत्याग्रहासाठी आलेल्या लोकांवर हिंसा केली. परंतु, अहिंसा हे तत्व मानणाऱ्या आंबेडकरांनी अस्पृश्य सत्याग्रहींना सनानती हिंदूंविरुद्ध हिंसा करु नका असा आदेश दिला होता, त्यामुळे एव्हढी हिंसा होऊनही आणि प्रत्यक्षात स्थानिकांपेक्षा संख्येने जास्त असूनही काठीधारी अस्पृश्यांनी संयम बाळगला. अस्पृश्यांनी तळे बाटवले म्हणून सनातनी, जातीयवादी हिंदूंनी गोमूत्र टाकून ब्राह्मणांकडून तळ्याचे शुद्धीकरण करुन घेतले. पुढे महाडच्या नगरपालिकेने स्थानिकांच्या दबावाला बळी पडून अस्पृश्यांना चवदार तळे खुले करण्याचा ठरावही रद्द केला. त्यामुळे बाबासाहेबांनी २५ आणि २६ डिसेंबर रोजी रोजी महाड येथे परिषद घेण्याचे ठरवले. या परिषदेचा उद्देश स्पष्ट करताना डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, आतापर्यंत आम्ही या तळ्याचे पाणी पिऊ शकलो नाही किंबहुना आम्हाला पिऊ दिले नाही, आता आम्ही या तळ्याचे पाणी प्यायलो म्हणजे आमचे सर्व दुःख नष्ट होईल, आमची सर्व परिस्थिती सुधारेल, आमच्यावरील अन्याय कमी होईल असे काही नाही. हा सत्याग्रह म्हणजे केवळ एका मानवाने दुसऱ्या मानवाला समानतेने कसे वागवावे हे सांगण्याचा व सर्व मानवाला समानतेचा अधिकार आहे हे दाखवण्याचा प्रयत्न आहे. समतेची मुहूर्तमेढ रोवण्यासाठी जगाच्या पाठीवर पिण्याच्या पाण्यासाठी केलेला हा एकमेव सत्याग्रह आहे म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली झालेला हा सत्याग्रह मानव मुक्तीचा सत्याग्रह म्हणून ओळखला जातो.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# एक बाटली पाणी, झाडासाठी उपक्रमाचा महापालिकेत शुभारंभ



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. कडक उन्हात शहरातील झाडे जगवण्यासाठी नागरिकांनी स्वयंप्रेरणेने 'एक बाटली पाणी, झाडासाठी...' या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले. महापालिका आवारात असलेल्या बागेतील झाडांना आयुक्त ओम्बासे आणि परसबाग सोलापूरचे मुख्य प्रवर्तक नारायण पाटील यांच्या हस्ते बाटलीने पाणी घालून एक बाटली पाणी झाडासाठी या उपक्रमाचा शुभारंभ केला. माझी वसुंधरा अभियान, सोलापूर महापालिका आणि परसबाग सोलापूर यांचा हा संयुक्त उपक्रम होता. शहरात वृक्षारोपण केलेल्या रोपांना लोकसहभागातून नियमितपणे पाणी मिळावे व त्याचे संवर्धन व्हावे तसेच या संदर्भात मोठ्या प्रमाणात जनजागृती व्हावी या हेतूने हा उपक्रम हाती घेण्यात आला होता. परसबागचे प्रतिनिधी शिरीष गोळवलकर यांनी स्वागत केले. पाटील यांनी या उपक्रमाची माहिती दिली. डॉ. भारत मुळे यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त रवी पवार, उपायुक्त तैमूर मुलाणी, सहायक आयुक्त शशिकांत भोसले, पर्यावरण संवर्धन अधिकारी अक्षय मोरे, जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार, पर्यावरण अधिकारी स्वप्निल सोलनकर, परसबागच्या सहप्रवर्तिका शुभदा पाटील, स्मिता देशपांडे, पवन देसाई, प्रकाश कुलकर्णी, विजयानंद स्वामी, डॉ. सजेर्राव दौलतोडे, श्रीशैल स्वामी, सुप्रिया जक्कल, मनोज देवकर, काशीनाथ भतगुणगी, अनिल मुतालिक देसाई, अविनाश बेंजरपे, महेंद्र आठवले, सुप्रिया ठाणे, अनिता कोळी, स्नेहश्री देसाई उपस्थित होते.

# पैलवान अजय भुसनर याचा शिवसेनेच्या वतीने सन्मान



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** अकलूज येथे आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र केसरी निवड चाचणी कुस्ती स्पर्धेत पैलवान अजय भुसनर राहणार जांभूड याची ६१ किलो वजन गटातून निवड झाल्याबद्दल शिंदे गटाचे शिवसेना माळशिरस तालुका प्रमुख सतीश सपकाळ यांनी पैलवान अजय भुसनर याचा फेटा हार घालून सन्मान केला व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.यावेळी वस्ताद भिमराव भुसनर, शिवसैनिक महादेव तुपसौंदर, सुनील साठे,महेंद्र साठे,नातेपुते शहर प्रमुख निखिल पलंगे, उपशहर प्रमुख भैया लांडगे,अकलूज शहर प्रमुख महेश पवार, रणजित गायकवाड,माळशिरस शहर प्रमुख महादेव जगताप सह सर्व शिवसैनिक उपस्थित होते.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# अभिनव स्कूल मध्ये विद्यार्थ्यांचा आनंदी बाजार व महिलांसाठी होम मिनिस्टर खेळ रंगला



**वाशिंबे (कटूसत्य वृत्त):–** अभिनव पब्लिक स्कूल वाशिंबे ता.करमाळा या प्रशालेमध्ये विद्यार्थ्यांचे व्यवहारिक ज्ञान वाढावे तसेच त्यांना विविध व्यवसायांची ओळख व्हावी या उद्देशाने विद्यार्थ्यांचा आनंदी बाजार आयोजित केलेल्या या बाजारामध्ये आर्थिक चलनाचया उलाढालीतून व्यवहारीक ज्ञान मिळते या उद्देशाने हा उपक्रम प्रशालेत राबविण्यात आला. विद्यार्थ्यांनी अगदी भाजीपाला पासून ते हॉटेलचे गोड खाण्याचे पदार्थ असे विविध प्रकारचे स्टॉल उभे करून आपले कौशल्य त्यात दाखवून दिले.

विद्यार्थीच्या मातासाठी होम मिनिस्टर खेळ रंगला पैठणीचा या कार्यक्रमांचे आयोजन केले. रांगोळी, लिंबू चमचा, तळ्यात मळ्यात, संगीत खुर्ची, प्रश्न मंजुषा, उखाणे यासारख्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या.पालकांनी या कार्यक्रमांमध्ये मोठ्या प्रमाणावर आपला सहभाग नोंदवला तसेच बक्षीसा ची देखील लय लूट करण्यात आली स्पर्धेच्या प्रथम क्रमांकाच्या पैठणीच्या मानकरी अश्विनी सचिन भोईटे या ठरल्या तर द्वितीय क्रमांक पूजा रेवन्नाथ बोबडे तर तृतीय क्रमांकाच्या मानकरी सारिका धनंजय साखरे या ठरल्या. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून अनिता महादेव झोळ नीता आबासाहेब झोळ आणि इंदुबाई जगन्नाथ झोळ या उपस्थित होत्या

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अभिनव प्रशालेतील सर्व शिक्षक स्टाफ तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी खूप मेहनत घेतली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक साक्षी सोनवणे आणि ऐश्वर्या साळवे यांनी केले तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिता जाधव आणि प्रेमा चव्हाण मॅडम यांनी केले. तर कार्यक्रमासाठी परीक्षक म्हणून ज्योती चव्हाण आणि तेजस्वी झोळ यांनी ही जबाबदारी पार पाडली तसेच चालता–बोलता, प्रश्नमंजुषा संध्या महानवर यांनी घेतले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन जाधव यांनी केले असून सर्व यशस्वी महिला स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.

# महापालिका कामगाराच्या मृत्यूनंतर आयुक्त डॉ. ओंबासे यांच्याकडून सांत्वन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर महानगर पालिकेत कार्यरत असलेले शिवाजी कदम (बिगारी) याचं ११ मार्च २०२५ रोजी सकाळी कामावर असताना हृदय विकराच्या झटक्याने मृत्यू झाला आहे व सूरज सांगे (सफाई कामगार) याचं १४ मार्च २०२५ रोजी कामावर असताना हृदय विकराच्या झटक्याने मुर्त्यू झाले असून आज महापालिकेचे आयुक्त डॉ सचिन ओम्बासे यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन परिवाराचे सांत्वन पर भेट घेतली. यावेळी अतिरिक्त आयुक्त रवि पवार, मुख्य सफाई अधिकारी नागनाथ बिराजदार उपस्थिती होते. हे दोन्ही कर्मचारी नेमून दिलेले कामं उत्कृष्ठ रित्या करत होते. आयुक्त यांनी मयत कर्मचारी यांच्या परिवारातील व्यक्तींना लवकरत लवकर मनापा सेवेत समवून घेतले जाईल असे आश्वासन दिले.



**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**उपविभागीय अधिकारी कार्यालय पंढरपूर विभाग पंढरपूर**
पत्ता – पदमावती तळ्याचे पाठीमागे, स्टेशनरोड, पंढरपूर
दुरध्वनी क्र.०२१८६–२२३५६३ ईमेल - sdopndharpur2025@gmail.com

क्रं. भूसंपादन/कावि/४७३/२०२५ दिनांक– १२/०३/२०२५

**अधिसूचना**
**सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९**
**कलम ४ पोटकलम १**

याअर्थी, सन २०१८ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९ चे कलम ४ उपकलम (१) अन्वये प्रदान करणेत आलेल्या महाराष्ट्र राज्यात सुविधा व सेवा (विद्युत तारमार्ग वगळता) देण्यासाठी भूमिगत नळमार्ग टाकण्यासाठी आणि भूमिगत वाहिन्या बांधण्याकरिता जमिनीमधील वापर हक्काचे संपादन करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्हयातील जमीनीचा वापर हक्काच्या संपादनाची घोषणा करीत आहे.

ज्याअर्थी, सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पंढरपूर विभाग पंढरपूर यांचेकडून उक्त अधिनियमातील कलम ३ चे उपकलम (१) अन्वये अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र भाग १ – पुणे विभागीय पुरवणी – गुरुवार ते बुधवार, दिनांक ६ मार्च २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यात असे अधिसूचित करण्यात आले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये स्थूलमानाने दर्शविण्यात आलेल्या जमिनी सोलापूर शहर वाढीव पाणीपुरवठा योजना ( उजनी धरण उद्भव १७० द.ल.लि) अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्हयाकरिता भुमिगत वाहिन्या टाकणे या सार्वजनिक प्रयोजनाकरिता वापरहक्कासाठी संपादन करण्यात आल्या आहे.

ज्याअर्थी, संपादित होणाऱ्या जमिनीशी आपण हितसंबंधित आहात, उक्त अधिनियमाच्या कलम ३ चे पोटकलम (१) अन्वये आपले जमिनीत असलेले हक्क व हितसंबंधाबाबत तसेच नुकसानभरपाई संदर्भात असणारे दावे इत्यादीबाबत निवेदने तसेच आक्षेप मागविण्यासाठी जाहीर प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर अधिसूचनेमध्ये पंढरपूर तालुक्यातील आक्षेप अर्ज स्वीकारणेकरिता कलम ३ (१) ची अधिसूचना प्रसिध्द झालेपासून २१ दिवसाचा कालावधी देण्यात आलेला होता. सदर कालावधीत या कार्यालयास आक्षेप अर्ज प्राप्त झाले नाहीत.

त्याअर्थी, याद्वारे आपणांस कळविण्यात येते की, उक्त अधिनियमाच्या कलम ४ (१) उपबंधानुसार भूमिगत नळमार्ग टाकण्यासाठी व भूमिगत वाहिन्या उभारण्यासाठी उक्त अनुसूचीमध्ये नमूद जमिनीमधील वापरहक्क संपादित करण्यात येत आहेत. याद्वारे उक्त जमिनीमधील वापर हक्क सर्व भारांपासून मुक्त अशा स्वरुपात राज्य शासनाकडे निहित झाले आहेत.

**अनुसूची**

**महाराष्ट्र राज्यात सुविधा व सेवा (विद्युत तारमार्ग वगळता) देण्यासाठी भूमिगत नळमार्ग टाकण्यासाठी आणि भूमिगत वाहिन्या बांधण्याकरिता जमिनीमधील वापर हक्काचे संपादन करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक – ४९ दिनांक ९/०८/२०१८ चे कलम ४ (१) मधील तरतुदीनुसार सर्व भारांपासून मुक्त अशा स्वरुपात राज्य शासनाकडे निहित होणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्हयातील बांधीव अथवा मोकळया जागेचे संक्षिप्त वर्णन.**

**संयुक्त मोजणी विवरणपत्रकानुसार**

| अ.क्र. | जमीनमालक किंवा भोगवटदार यांचे नाव | तालुका | गावाचे नाव | भूमापन क्रमांक | भूमिगत नळमार्ग टाकण्याकरिता किंवा भूमिगत वाहिन्या उभारण्याकरिता वापरहक्काचे संपादन करण्यासाठीची आवश्यक जमीन (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | भारत सरकार राष्ट्रीय म.न, सडक परिवहन व राजमार्ग मंत्रालय भारत सरकार, गोपाळ भागवत फराटे, औदूंबर गोपाळ वरपे, चित्रा उर्फ अर्चना नवल शिंदे, नंदा अशोक शिखरे, मनीषा बाळासाहेब दळवी, मिथून शामराव अभिवंत, वैशाली सोमनाथ होळकर, सज्जन मारुती अभिवंत, स्वपना विठ्ठल भोसले, स्वाती औदूंबर वरपे, आकाश नवनाथ अभिवंत. | मोहोळ | देवडी | ७२५ पै | ०.२० हे. आर पैकी ०.०४५० हे. आर यापूर्वी राष्ट्रीय महामार्गाकरीता संपादित आहे. उर्वरीत क्षेत्र ० हे १५.५० आर |
| | | | | एकुण एकंदर | ०.१५.५० |

**सही/–**
**(सचिन इथापे )**
**सक्षम प्राधिकारी तथा**
**उपविभागीय अधिकारी पंढरपूर**
**विभाग पंढरपूर**

जिमाका/सो/जाहि/३७७/२०२४–२५

# सहकार महर्षीनी सहकारातून नवमहाराष्ट्र घडविला – प्रा.आप्पासाहेब खोत



**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर व शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार महर्षी शंकरराव मोहिते–पाटील स्मृती व्याख्यानमालेचे सातवे पुष्प गुंफताना साहित्यिक आप्पासाहेब खोत सहकार महर्षी शंकरराव मोहिते–पाटील यांच्या जीवनात साहित्य आणि वक्तृत्व यांचे स्थान या विषयावर प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.प्रकाश महानवर उपस्थित होते.

प्रा.आप्पासाहेब खोत यांनी सहकार महर्षीच्या जीवन व कायार्चा आढावा घेत. सांगितले की, महाराष्ट्रामध्ये सहकार चळवळ कशी रुजली व सहकार चळवळीतून माळशिरसच्या माळरानावर हरितक्रांती व धवलक्रांती फुलविणाऱ्या सहकार महर्षीच्या विशाल दृष्टिकोनातून समृद्धीची व संपन्नतेची शिखरे पादाक्रांत करीत असताना. नवमहाराष्ट्र घडविण्याची मुहूर्तमेढ रोवल्याचे स्पष्ट केले. मातीत रमणाऱ्या माणसाची माती होऊ नये हे जाणणारे,माणसांना सहकाराच्या माध्यमातून जगण्याचा विचार देणारे व अनेक संकटांशी सामना करत लोकांच्या भविष्याचा विचार करणारे सहकार महर्षी हे दूरदृष्टी नेते होते,असे विचार त्यांनी व्यक्त केले.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना कुलगुरू महानवर म्हणाले की, सर्वसामान्य माणसांच्या उद्धारासाठी सहकाराच्या माध्यमातून उदरनिवार्हाची अनेक साधने सहकार महर्षीनी निर्माण केली व अनेकांचे आयुष्य उजळवून टाकले. महाराष्ट्रामध्ये सहकारातील अनेक प्रयोग हे माळशिरस तालुक्यात यशस्वीपणे राबविले व त्यातून क्रांती केली.सहकार सहकार महर्षीच्या कायार्ची ओळख ही विद्यापीठातील प्रत्येक महाविद्यालयात व्याख्यानाच्या माध्यमातून पोहोचवली पाहिजे व सहकार महर्षीच्या कार्याचा महिमा या व्याख्यानमालेच्या माध्यमातून सर्वदूर पोहोचला पाहिजे.असे मत व्यक्त केले.

या सहकार महर्षी शंकरराव मोहिते–पाटील स्मृती व्याख्यानमालेसाठी शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव हर्षवर्धन खराडे–पाटील, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. देवानंद चिलवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक विनोदकुमार दोशी, कुलसचिव डॉ. योगिनी घारे, वाणिज्य व व्यवस्थापन संकुलाचे प्रभारी संचालक डॉ. राजीवकुमार मेंते, शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक बाळासाहेब सणस, उत्कर्ष शेटे, वसंत जाधव, रामचंद्र गायकवाड, शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवप्रसाद टिळेकर,रसायन शास्त्र संकुलाचे संचालक डॉ. अनिल घनवट, उपकुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे, उपकुलसचिव डॉ. सूर्यकांत कांबळे, प्रशांत चोरमले, डॉ.वर्षा भोसले, सोलापूर जिल्ह्यातील साहित्यिक इंद्रजीत घुले, शिवाजी बागल, अनंत पाटील संकुलाच्या समन्वयक डॉ. वनिता सावंत,डॉ. रश्मी दातार, डॉ.इम्तियाज सय्यद, डॉ.विघ्नेश नादरगी, डॉ.जयश्री मुंडेवाडीकर, प्रा.मुग्धा जगदाळे, प्रा.वनिता सोनवणे, प्रा.सौजन्या घंटे तसेच शिक्षण प्रसारक मंडळातील शाखाप्रमुख, शिक्षक,पत्रकार, विद्यापीठातील अधिकारी वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.वनिता सावंत यांनी केले तर आभार डॉ.जयश्री मुंडेवाडीकर यांनी मानले.


## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

–: संपर्क :–
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण



**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..



(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्‌ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


# पाण्याच्या शोधात आलेल्या हरिणाच्या पिल्लाला मिळाले जीवदान




**दक्षिण सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** कुमठे तांडा येथील सकाळी पहाटेच्या वेळी हरणाचा कलप धावतांना राठोड गुरुजी यांना दिसले, त्या प्रसंगी काही मोकाट कुत्रे, हरीण्याचे पाठलाग करीत होते, त्यांच्यावर आलेल्या संकटाला मात करण्यासाठी हरिण पळत होत्या परंतु जवळच शेतीला तारेचे कंपाऊंड असल्यामुळे वेगवान धावणारा हरीण त्या कंपाऊंडला धडकला आणि पायाला दुःखापत झाले. या वेदणामुळे त्या हरीणाला चालता सुद्धा येत नव्हते.

यावेळी राठोड यांनी त्यांचे मित्र अर्जुन चव्हाण यांच्याशी संपर्क साधून, वनविभागाशी फोन वर माहिती दिलं आणि वनकर्मचारी दाखल झाले,तत्काळ व हरिणाला पुढील तपासणी वन विभाग कर्मचारी घेऊन गेले, अशी माहिती राठोड सर यांनी दिले.

रखरखत्या उन्हाळ्यात पाण्याच्या शोधात पशु, पक्षी, हरीण, लांडगे, साबर, असे वनजीव अन्न आणि पाण्यासाठी भटकंती करीत असतात, सबंधीत विभागातील, अधिकारी, कर्मचारी यांनी वनजीव यांच्यासाठी पाण्याचे नियोजन करावे

**– मोहन राठोड**

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) सोलापूर जिल्ह्यातील मूळचे अकलुजचे असलेले नेते
२) फायदा
३) इतिहासकालीन राजसभेची जागा, बाब
४) मोदींचा पक्ष
५) मनसे प्रमुख
६) चुलत्यांना या नावाने संबोधतात
७) राजकारणात एंट्री करणारा एक दाक्षिणात्य अभिनेता
१४) अवजड १५) सीतापती
१८) एक म्हण - अति तेथे **
२०) नगरपालिका प्रमुख
२२) यश अपयश
२४) एबीसीडीतील शेवटून दुसरे अक्षर २५) युध्द मैदान, वाळवंट
२८) परीक्षेत उत्तीर्ण होणे
३१) घर बांधकामासाठी मातीपासून बनवितात ती
३२) कोकणातील एक तालुका
३३) एक वजनमाप ३५) भिंतीला पडलेली भेग (हिंदीत)
३७) जादू, किमया
३८) शक्ती, उर्जा ३९) सामान्य
४०) शिवसेनेचे मुखपत्र ४१) लय, रिदम ४३) आशिर्वाद, नवरा मुलगा
४५) एक म्हण - दाम करी **

**आडवे शब्द :** १) आमदारांचे सभागृह
५) पॉलिटिक्स
८) वडील (इंग्रजीत)
९) शर्टला बटण अडकविण्यासाठीची खाच
१०) सफलता
११) मदनाची पत्नी
१२) मुंबईलगतचा एक जिल्हा
१३) बँकांची कोट्यावधीची कर्जे बुडवून फरार झालेला - *** मोदी
१६) कविता बनविताना जुळविला जाणारा शब्दांलकार १७) एक साबण १९) पाऊस (इंग्रजीत) २१) पाणी पिण्याची तीव्र इच्छा, तृष्णा २३) एक मौल्यवान रत्न २४) माकड २६) किल्ला २७) दार उलट लिहा २८) चप्पल (ग्रामीण भाषेत) २९) एक म्हण - हाजीर तो *** ३०) पंधरा + आठ ३२) संदेश देण्याचे साधन ३४) बसण्यासाठी आयताकृती लाकडापासून बनविलेला ३५) सावध ३६) चिन्हे ३८) स्वयंप्रकाशित ग्रह, स्टार ३९) ब्रेड (मराठीत) ४०) प. महाराष्ट्रातील क्रांतीकारी जिल्हा ४२) पटकन, लगेच ४४) पाठीचा कणा यापासून बनतो ४६) मलम उलट लिहा ४७) दात ४८) एक म्हण - ** सोडून संन्याशाला फाशी ४९) तीस दिवसांचा माह

## सुडोकु – 204

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | | 7 | 2 | |
| | | 3 | 2 | 7 | 8 | | 9 | |
| | 5 | 7 | | | | 3 | | 8 |
| | | | 9 | 6 | | | 7 | 1 |
| | | | | 8 | 2 | | 6 | 3 |
| 1 | 9 | 6 | | | | | 4 | 2 |
| 3 | | 8 | | 2 | 9 | | | 4 |
| | | 9 | | 5 | 1 | | | |
| | 6 | | 7 | | 3 | | 8 | 9 |

# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात रंगपंचमी मोठ्या उत्साहात साजरी

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर भारताची दक्षिण काशी व महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री. विठ्ठल रुक्मिणी देवस्थान म्हणून प्रसिध्द आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात रंगपंचमी मोठ्या उत्साहात व पारंपारिक पद्धतीने साजरी करण्यात आली. विठूरायावर केशर आणि गुलालाची उधळण केल्यावर ह्व अवघा रंग एक झाला, रंगी रंगला श्रीरंग ह्व या अभंगाची प्रचिती आली.



वसंतोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे रंगपंचमी. वसंत पंचमी पासून रंगपंचमी पर्यंत दररोज विठूरायाला पांढऱ्या पोशाखावर गुलाल टाकून पूजा केली जाते. सलग महिनाभर हा दिनक्रम सुरु असतो. या उत्सवाची सांगता रंगपंचमीला होते.

रंगपंचमी दिवशी दुपारी 4.30 वाजता श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची पाद्यपुजा व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या शुभहस्ते सपत्नीक करण्यात आली. यावेळी मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे, विभाग प्रमुख संजय कोकीळ उपस्थित होते.

देवाच्या अंगावर केशरयुक्त रंग व गुलाल टाकण्यात आला. नंतर डफाची पुजा करुन नामदेव पायरी– तुकाराम भवन – पश्चिम द्वार – चौफाळा – पश्चिम द्वार – व्हीआयपी गेट – नामदेव पायरी अशी मंदिर प्रदक्षिणा करून डफाची सवाद्य मिरवणुक काढण्यात आली. सदर मिरवणुकीमध्ये रंगाची उधळण करून व मानकऱ्यांना प्रसाद देवून वसंतोत्सवाची सांगता करण्यात आली. या उत्सवाचे सर्व नियोजन विभाग प्रमुख पांडुरंग बुरांडे व नित्योपचार विभागातील कर्मचाऱ्यांनी केले होते. यावेळी उत्साहात मंदीर समितीचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते.

# जिल्हा परिषद आवारात घुमणार पक्षांचा आवाज

## जि.प. मराठा सेवा संघाने केली पक्षांना पाण्याची सोय

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** उन्हाळा चाहूल लागली असून, या दिवसात पक्षी पाण्यासाठी वणवण हिंडत असतात. त्यामुळे मराठा सेवा संघाने जिल्हा परिषद आवारातील बागेत पक्षासाठी पाण्याची सोय केली आहे.तसेच काँक्रीटच्या जंगलामध्ये चिमन्यांना घर करणे शक्य नाही यासाठी कृत्रीम घरटे तयार केले आहेत, तसेच सवार्नी पक्षासाठी पाण्याची सोय करावी असा रंगपंचनीनिमीत्त संदेश दिला. यामुळे जिल्हा परिषद आवारात पक्षांचा आवाज घुमणार आहे. मराठा सेवा संघ शाखा जिल्हा परिषद च्या वतीने पक्षांना पाण्याची सोय करणेत आली आहे. त्याचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी कुलदीप जंगम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे यांचे



शुभहस्ते करणेत आले . सदर प्रसंगी अनुपमा पडवळे, राजश्री कांगरे,वेशाली शिंदे, स्मिता पोरेड्डी, शितल कडलासकर, राजश्री रोजी, अनिता तुपारे, प्रियंका डांगे, स्मिता चव्हाण, अंजली पेठकर, आरती माढेकर, सविता मिसाळ, गौरी कदम, राणी तवटी, छाया क्षीरसागर, श्रीदेवी माने, अर्चना निराळी, सुवर्णा पंगुडवाले, भारती उमराणी, मराठा सेवा संघ जि प शाखेचे अध्यक्ष अविनाश गोडसे, कॅस्ट्राईब संघटनेचे अध्यक्ष अरुण क्षीरसागर,कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष राजेश देशपांडे, गिरीष जाधव राज्य सहसचिव दिनेश बनसोडे, सुर्यकांत मोहिते, लिपीक संघटनेचे अध्यक्ष नागेश पाटील आरोग्य संघटनेचे समीर शेख, संतोष जाधव, रणजीत घोडके, राजपाल रणदिवे, अमित सलगर, योगेश हब्बु लक्ष्मण वंजारी श्रीकांत मेहेरकर, उमाकांत कोळी, मल्लीनाथ स्वामी, सचिन चव्हाण,अनिल जगताप, सुहास चेळेकर, सचिन साळुंखे, सुधाकर माने देशमुख, चेतन भोसले, रोहीत घुले, विकास भांगे, सचीन जाधव, संतोष शिंदे, गणेश साळुंखे, गणेश कलुबर्मे, मंजुनाथ चिंचोळे, संजय कांबळे, मंगेश पंदे , संजय कुंभार, नरसिंह गायकवाड, महेश केंद्रे, महेश जाधव, पणेश ओहोळ, दिपक सोनवणे, गणेश कलुबर्मे, विशाल घोगरे, विठ्ठल मलपे, संजय पाटील, भूषण काळे,रणजीत गव्हाणे, उमेश खंडागळे, सचिन खराडे, प्रसाद काशीद, संतोष निळ, जयंत पाटील, सचिन लामकाने, हरिभाऊ देशमुख, राजु देशमुख, किरण देशमुख, राजु आतकरे, महेंद्र माने, अनिल पाटील, अजित देशमुख, गोपाल शिंदे, नितीन जाधव, ऋषिकेष जाधव अभिजीत निचळ, संतोष सातपुते, पी. बी.पवार, अमरसिंह पताले, सुरज कव्हाळे, संजय चव्हाण, रोहन भोसले, प्रकाश शेंडगे, विनायक कदम, प्रदिप सुपेकर, मनोज वडगावे,तानाजी पवार, प्रविण पवार, उत्कर्ष इंगळे, मुशीर कलादगी,शामेल आडाकुल, महेश आदमाने, रोहन भोसले, चंदु कोळी, हरिष म्हेत्रे, योगेश हबु, विलास मसलकर, सुजित पु काळे, बिचल, जमीर शेख, सैफन जमादार आदि आदि उपस्थित होते. या उपक्रमाबाबत पक्षीप्रेमी नागरीकांनी कौतुक केले आहे.

# स्व.नागेश करजगी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ ऑर्किड स्कुलमध्ये नेत्र तपासणी शिबीर संपन्न



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील नागेश करजगी ऑर्किड स्कुलमध्ये संस्थेचे प्रेरणास्थान स्व.नागेश करजगी यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उदघाटन संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार करजगी यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी संस्थेचे विश्वस्त नंदिनी करजगी, सोमनाथ करजगी, राजेश करजगी, संस्थेच्या सचिवा वषार्ताई विभुते, व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, प्राचार्या रुपाली हजारे, प्रि.प्रायमरी इन्चार्ज अनिता अनगोंडा, डॉ.गौस मुजावर, डॉ.मंजिरी पाटील, डॉ.आशिष चौधरी उपस्थित होते.

सदर शिबिरामध्ये पुणे येथील एच. व्ही देसाई रुग्णालयाच्या तज्ञ डॉक्टर्सनी शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी केली. तसेच सोलापूर शहरातील नागरिक या शिबिरात मोठ्या प्रमाणात आले होते. त्यांची देखील नेत्र तपासणी करण्यात आली. शिबिरातील गरजू रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी पुणे येथे पाठविण्यात येणार आहे. या शिबिरात जवळपास ५०० हुन अधिक नागरिकांनी भेट देऊन शिबीराचा लाभ घेतला.सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# नातेपुते पोलीस ठाणे येथे महारक्तदान शिबिरा मध्ये ९०३ रक्तदात्यांनी केले रक्तदान

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून व अप्पर पोलीस अध्यक्षक प्रीतम यावलकर अकलूज उपविभागीय पोलीस अधिकारी नारायण शिरगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली नातेपुते पोलीस ठाणे येथे नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे यांनी एक थेंब रक्ताचा फुलवितो अंकुर जीवनाचा हे ब्रीदवाक्य घेऊन नातेपुते पोलीस ठाणे येथे महारक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. नातेपुते येथील ज्ञानदीप ब्लड बँक यांनी रक्त संकलन करून घेण्यासाठी ५० कॉटची व्यवस्था करून ५५ प्रशिक्षित सुसज्ज स्टाफ व डॉक्टर या ठिकाणी नेमले होते. रक्तदान करण्यासाठी नातेपुते व नातेपुते परिसरातील ३१ गावातील लोकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला होता. यामध्ये सामाजिक संस्था, पत्रकार, गणेशोत्सव, नवरात्र उत्सव मंडळाचे पदाधिकारी, आर्ट ऑफ लिविंग चे पदाधिकारी



तसेच नातेपुते येथील तृतीयपंथी लोक, ग्रामीण भागातील महिला मजूर वर्ग, शेतकरी वर्ग अशा अनेक विविध जाती धर्माच्या लोकांनी रक्तदान एक श्रेष्ठ दान असे म्हणत मोठ्या प्रमाणात रक्तदान केले. तसेच अकलूज उपविभागीय पोलीस अधिकारी नारायण शिरगावकर यांनी रक्तदान शिबिरास भेट दिली असता त्यांनी स्वतः या रक्तदान शिबिरात रक्तदान केले. सकाळी ९ वाजता सुरू करण्यात आलेले रक्तदान शिबिर रात्री ८ वा.४५ मिनिटापर्यंत सुरू होते. महारक्तदान शिबिरामध्ये ९०३ लोकांनी रक्तदान केले. रक्तदात्यांसाठी अल्पोपराची सोय करण्यात आली होती. रक्तदान शिबिर पार पाडण्यासाठी सपोनी महारुद्र परजणे, पी.एस.आय. विक्रांत दिघे, पीएसआय धनाजी ओमासे, पोलीस ठाणे कर्मचारी स्टाफ, होमगार्ड पथकातील कर्मचारी, पोलीस पाटील यांनी परिश्रम घेतले. महारक्तदान शिबिरामध्ये रक्तदात्यांनी रक्तदान करून हा उपक्रम यशस्वी केल्याबद्दल सर्व रक्तदात्यांचे नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे यांनी पोलीस ठाणे तर्फे हार्दिक आभार मानले.

# बायोफ्लॉक मत्स्यसंवर्धनाबाबत 20 व 21 मार्च रोजी प्रशिक्षण कार्यशाळा

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** बायोफ्लॉक मत्स्यसंवर्धन हे आधुनिक तंत्रज्ञान असून हे किफायतशीर होण्यासाठी टँक उभारल्यानंतर प्रत्यक्ष मत्स्यबीज संचयनापूर्वी पूर्वतयारी बरोबरच मत्स्यसंवर्धनामध्ये खाद्य व्यवस्थापनासह माशांचे आरोग्य व्यवस्थापन शास्रोक्त पद्धतीने करणे अत्यंत आवश्यक असते. तसेच उत्पादनाबरोबरच विक्री व्यवस्थापनदेखील महत्वाचे आहे. बायोफ्लॉक मत्स्यसंवर्धनाबाबत मार्गदर्शन करण्याची बाब विचारात घेवून मत्स्यव्यवसाय विभाग, पुणे यांचेकडून बायोफ्लॉक मत्स्यसंवर्धनाबाबत प्रशिक्षण कार्यशाळा दिनांक 20 ते 21 मार्च 2025 रोजी कृषी महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे येथे प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेमध्ये शास्त्रोक्त बायोफ्लॉक मत्स्यसंवर्धनाबाबत महत्वाची माहिती व प्रात्यक्षिक समजावून घेण्याच्या दृष्टीने शास्त्रज्ञ, प्राध्यापक, तज्ञ अधिकारी व अनुभवी बायोफ्लॉक मत्स्यसंवर्धक यांचेमार्फत सविस्तर मार्गदर्शक तसेच बायोफ्लॉक मत्स्यसंवर्धन प्रकल्पस्थळी प्रत्यक्ष भेटीद्वारे प्रात्यक्षिक दाखविण्यात येणार आहे.

सदर प्रशिक्षणामध्ये पुणे, सातारा, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना व परभणी या जिल्ह्यांतील बायोफ्लॉक प्रकल्प असलेल्या प्रधानमंत्री मत्स्यसंपदा (पीएमएमएसवाय) अंतर्गत बायोफ्लॉक कल्चर योजनेतील सर्व बायोफ्लॉक मत्स्यसंवर्धन प्रकल्पधारकांनी तसेच बायोफ्लॉक मत्स्यसंवर्धन प्रकल्प मंजूर झालेल्या लाभार्थ्यांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे. असे आवाहनही पुणे व छत्रपती संभाजीनगर विभागाचे प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय विजय शिखरे यांनी कळविले आहे.अधिक माहितीसाठी ९४२३७५८८२४, ९८८१६००९५१ व ८२०८४१३०११ या क्रमांकांवर संपर्क साधावा असे सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय रत्नाकर राजम यांनी कळविले आहे.

# 'परोपकारी वृत्तीने वागल्यास परमेश्वर भरभरून देतो'- जयवंतराव जगताप

**करमाळा, (कटूसत्य वृत्त):-** जीवनामध्ये सुखदुःख सर्वांनाच येत असतात. परंतु परमेश्वरांनी दिलेल्या परिस्थितीमध्ये भगवंताचे नामस्मरण करत आनंदाने राहणे हे महत्त्वाचे असते. परोपकारी वृत्तीने वागल्यास परमेश्वर भरभरून देत असतो. याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे जनार्दन तर्कसे होत. "असे प्रतिपादन माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी केले. श्री जनार्दन विठ्ठल तर्कसे यांच्या ९५व्या वाढदिवसानिमित्त जयवंतराव जगताप यांच्या शुभहस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला, त्याप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमानिमित्त 'मायबाप दैवत आपले' या विषयावर कवी इंद्रजीत भालेराव यांचे व्याख्यान केम (ता-करमाळा) येथे आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजक श्रीराम तर्कसे



सर यांनी केले. कार्यक्रमाला दिलीप दादा तळेकर, जयंत गिरी महाराज, पृथ्वीराज भैय्या पाटील, शैलेश देशपांडे मिरज, अजित तळेकर, सरपंच राहुल कोरे, पंचायत समितीचे माजी सभापती शेखर गाडे, आनंद शिंदे, दिलीप दोंड, विलास बिचितकर, दयानंद तळेकर, श्रीहरी तळेकर, सागर राजे दौंड, सागर राजे तळेकर, दत्तात्रय बिचितकर, बाळासाहेब देवकर, विष्णू दादा पारखे, गोसेवक परमेश्वर तळेकर, महावीर आबा, अच्युत काका, संदीप तळेकर, गणेश तळेकर, बाजार समितीचे सहसचिव रवींद्र उकिरडे व दिगंबर रासकर उपस्थित होते. या कार्यक्रमांमध्ये विराज तळेकर यांनी कविता वाचन करून श्रोत्यांची मने जिंकली. सूत्रसंचालन शहाजी रंधवे आणि साईनाथ देवकर गुरुजी यांनी केले तर आभार मंगेश तरकसे यांनी व्यक्त केले.

# एकनाथ शिंदेच्या चेहऱ्यामुळेच महायुतीचे २३२ आमदार : किरण साळी

**माढा (कटूसत्य वृत्त):-** एकनाथ शिंदेच्या चेहयार्मुळेच महायुतीचे सगळे २३२ आमदार निवडुन आले आहेत.अस ठणकावून सांगत राजकारण आकड्याचं गणित असतं आज ना उद्या एकनाथ शिंदेच राज्याचे मुख्यमंत्री होतील.असं मोठ वक्तव्य युवा सेनेचे मुख्य सचिव किरण साळी यांनी माढ्याच्या वाकाव मधील युवासेनेच्या मेळाव्यात केलंय. प्रत्येक शिवसैनिक -व युवा सैनिकाच्या मनात एकनाथ शिंदे साहेब मुख्यमंत्री व्हायला पाहीजेत हे आहे.आणी ते भविष्यात नक्कीच मुख्यमंत्री होतील.याची खात्री आहे.

एकनाथ शिंदेनी राबवलेल्या लोककल्याणकारी योजनांमुळे अडीच वर्षात केलेल्या कामांच्या झपाट्यामुळे एकनाथ शिंदे च्या चेहर्यावरच महायुतीचे सगळे आमदार निवडुन आलेत.ते लवकरच मुख्यमंत्री होतील.

वाकाव ता. माढा येथे युवा विजय महाराष्ट्र दौऱ्याच्या निमित्ताने आयोजित मेळाव्यात बोलत होते.यावेळी शिवसेनेचे सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख प्रा.शिवाजीराव सावंत, माजी पं. स.सदस्य पृथ्वीराज सावंत, युवासेनेचे पश्चिम महाराष्ट्र विभागीय सचिव ऋतुराज



**प्रा सावंतांना विधानपरिषद तर ऋतुराजला संघटनात्मक जबाबदारीची मागणी**

प्रा. शिवाजीराव सावंत यांच्यामुळे सोलापूर जिल्ह्यात प्रतिकूल परिस्थितीत शिवसेनेला ताकद मिळत आली असून शिवसेना जिंवत ठेवली. जिल्हात एकही सेनेचा आमदार नाही. सोलापूर शहर मध्यच्या जागेवरचा हक्क सोडला. त्यामुळे त्यांना विधानपरिषदेवर संधी द्यावी. युवासेनेचे संघटन मजबूत करण्यासाठी ऋतुराज सावंत यांना देखील मोठी जबाबदारी देण्याची आग्रही मागणी शिवसेनेच्या पदाधिकायार्नी बोलताना मांडली.यावर किरण साळीनी नक्कीच एकनाथ शिंदेकडून न्याय मिळवून दिला जाईल अशी भुमीका बोलताना मांडली.

**भगवेमय वातावरण**

युवा सेनेच्या वाकाव मधील मेळाव्याचे जंगी नियोजन सावंत परिवाराकडून करण्यात आले होते. प्रवेशद्वारापासून ते मेळाव्याच्या ठिकाणा पर्यत भगवे ध्वंज लावले होते तसेच प्रत्येक शिवसैनिक, युवा सैनिकांचा भगवा फेटा घालुन स्वागत केले जात होते. यामुळे भगवेमय वातावरण आणी शिवसैनिकांमध्ये मेळाव्याच्या ठिकाणी उत्साहाचे वातावरण संचारले होते.

क्षीरसागर, राज्य कार्यकारिणी सदस्य शिवाजी जाधव, सुजीत खुर्द, प्रियंका परांडे, सचिन कांबळे, युवासेना जिल्हाप्रमुख प्रियदर्शन साठे, उपप्रमुख बालाजी बागल, शिवसेनेचे माढा तालुकाप्रमुख मुन्ना साठे, वाकावचे सरपंच ऋतुराज सावंत,नगरसेवक अरविंद खरात आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना किरण साळी म्हणाले की, ना. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने लाडकी बहीण, युवक कल्याण, एस. टी. बसमध्ये तिकिट सवलत या लोककल्याणकारी योजना राबवल्या. त्यांच्या चेर्हयामुळेच महायुतीचे २३२ आमदार निवडून आले आहेत. एकनाथ शिंदे हे पुन्हा राज्याचे मुख्यमंत्री बनतील.

सोलापूर विद्यापिठाची निवडणुक लढवुन विद्यापिठावर भगवा फडकवणार आहोत. युवा विजय महाराष्ट्र दौऱ्यात शिवसेनेची संघटनात्मक बांधणी, युवासेनेचा विस्तार, महाविद्यालयीन युनिट्स तयार करणे हे या दौऱ्याचे उद्दिष्ट आहे. 'घर तिथे शिवसैनिक, गाव तेथे शिवसेना' या संकल्पनेद्वारे गावोगावी शिवसेनेचे संघटन मजबूत करण्यात येणार आहे.

महाराष्ट्रातील नंबर १ची युवा संघटना म्हणून युवा सेना दिसेल. उबाठा चे अनेक पदाधिकारी शिवसेना युवा सेनेत प्रवेश करताहेत. विरोधकांना धक्का देण्याच तंत्र सुरुच राहील. सोलापूर जिल्हावर एकनाथ शिंदेचे विशेष लक्ष आहे. सोलापूर जिल्हात युवासेनेचा मोठा झंझावात आहे. युवा संघटन वाढवण्यासाठी युवा संकल्प मेळावे घेतले जाताहेत. काम करणाऱ्याच्या पाठीमागे एकनाथ शिंदे कायम असतात. शिवाजीराव सावंतासह त्यांचे पुत्र ऋतुराज यांना येत्या काळात लवकरच एकनाथ शिंदे नक्कीच मोठी जबाबदारी देतील.

ऋतुराज क्षीरसागर यांनी प्रा. सावंत यांनी राबविलेल्या आरोग्याची वारी या उपक्रमाचे कौतुक करत, पूरग्रस्तांसाठी कोल्हापूर येथे १२ ट्रक चादरी व धान्य या मदतीचा ऋतज्ञतापूर्वक उल्लेख करत. सोलापूर जिल्ह्यात शहर मध्यची जागा आपल्याला मिळाली असती तर निवडून आली असती असे देखील विशेषपणे नमूद केले.

पृथ्वीराज सावंत यांनी प्रास्ताविकात दौऱ्याचा उद्देश स्पष्ट करत यापुढील काळात शिवसेनेचे जास्तीत जास्त जिल्हा परिषद सदस्य व ग्रामपंचायत सदस्य निवडून आणण्यासाठी संघटना वाढवायची आहे. ताकदीने व जोमाने निवडणूका लढवण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी महावीर देशमुख, प्रियंका परांडे, सुजीत खुर्द, शिवाजी जाधव, मुन्ना साठे, धर्मराज मुकणे, अरविंद खरात, यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजिंक्य काटे यांनी केले तर आभार सरपंच ऋतुराज सावंत यांनी मानले.

# स्व. महेश कोठे यांच्या जयंतीनिमित्त सुशील रसिक सभागृह येथे बैठक संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादी चे सर्वेसर्वा स्व. महेश (आण्णा) विष्णुपंत कोठे यांच्या 1 एप्रिल रोजी जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम संदर्भात चर्चा करण्यासाठी सायंकाळी सुशील रसिक सभागृह येथे सर्व प्रमुख कार्यकर्त्यांची मीटिंग आयोजित करण्यात आले होते.. अण्णांच्या फोटोला हार घालून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली, अनेक मान्यवरांनी डोळ्यातून अश्रू काढून अण्णांच्या आठवणी सांगितल्या, काही मान्यवरांनी पाणपोई चे आयोजन करण्यात



सांगितले आहे,काहींनी रक्तदान शिबिर घेण्यास सांगितले आहे, तर काहींनी वृक्षारोपण करण्यास सांगितले, महेश कोठे यांची जयंती निमित्त विडी घरकुल परीसर येथे सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे, डॉ सूर्यप्रकाश कोठे हे त्यांच्या हॉस्पिटलमध्ये मोफत आरोग्य शिबिर घेण्यात येणार असून, तसेच, आमदार देवेंद्र कुठे हे अनुउपस्थिती असल्यामुळे ते व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे मान्यवरांशी संवाद साधले.

या वेळी सोलापूर महापालिकेचे माजी नगरसेवक उमेश गायकवाड, सुरेश पाटील, प्रथमश कोठे, अशोक नीम्बरगी, ज्ञानेश्वर सपाटे, गुरुशांत धूतरगावकर, महेश गादेकर ,प्रशांत बाबर, बिजू प्रधाने,अशोक निंबर्गी, अंबादास करगुळे, मेघनाथ येमुल, श्रीनिवास जोगी, व्यंकटेश कोंडी, नाना काळे, राजकुमार हंचाटे, मधूकर आठवले,दिलीप कोल्हे, देवेंद्र भंडारे, बाळासाहेब शेळके, भूपती कमटम, पिंटप्पा गड्डम, मल्लिकार्जुन कमटम, अंबादास बिंगी, रामचंद्र जन्नू, सुरेश फलमारी, नरसैया इप्पाकायल, अशोक इंदापुरे,जनार्दन कारमपुरी, पद्मशाली ऑल इंडिया अध्यक्ष कंदकटला स्वामी, सत्यनारायण बोल्ली, रामकृष्ण कोंड्याल,दत्ता सुरवसे, नागेश वल्याळ तरी सर्व प्रमुख कार्यकर्त्यांची मोठया प्रमाणात उपस्थिती होती.


## कृषि उत्पन्न बाजार समिती, अकलूज

ता. माळशिरस, जिल्हा-सोलापूर

### निवीदा सुचना

बाजार समितीचे दुय्यम बाजारपेठ,नातेपुते येथे आर ओ प्लॅन्ट उभारणी करणेकामी संबंधित एजन्सी/कंपनीकडून निविदा मागविण्यात येत आहेत. सदरच्या निविदा दिनांक २०/०३/२०२५ ते २७/०३/२०२५ रोजी पर्यंत बाजार समितीच्या कार्यालयात स्विकारण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | तपशील | क्षमता | मुदत |
|---|---|---|---|
| ०१ | आर ओ प्लॅन्ट (उभारणीसह) | प्रति तास १ हजार लिटर | १ महिना |
| ०२ | पत्रा शेड | आर ओ प्लॅन्टकरीता | १ महिना |
| ०३ | सी.सी.टी.व्ही. | | १ महिना |

वरीलप्रमाणे इच्छुक मान्यताप्राप्त एजन्सी/कंपन्यांनी आपली निविदा विहित वेळेत बाजार समितीच्या कार्यालयीन वेळेत देण्यात यावीत.

टीप:- निविदाबाबतच्या नियम व अटी बाजार समितीच्या मुख्यालयात पहाण्यास मिळतील.

**राजेंद्र काकडे**
**सचिव**

**मदनसिंह मोहिते-पाटील**
**सभापती**

**कृषि उत्पन्न बाजार समिती, अकलूज ता.माळशिरस जिल्हा-सोलापूर**